# श्री साईलीला



5

या अंकांत —


* श्रीसाईबाबांचा गुरुमंत्र
* बाबांची लीला
* आमची दानधर्माची कल्पना
* शिवकालीन दोन विदेही
* वासनारूप आणि परिहार
* तुझ्या इच्छेप्रमाणें घडूं दे
* रामभक्तीचा महिमा
* मनाची शांति कशी मिळवाल ?
* आचार'धर्माचें महत्व
* राजा आणि यमदूत
* एक देवभक्त आणि त्याचा मुलगा
* नीलवर्ण घनःश्याम
* दत्तावतार श्रीनरसिंह सरस्वती
* श्रीगुरुसत्कथामृतलता
* श्रीसाईसच्चरित ( गद्यानुवाद )
* श्रीगुरुपौर्णिमा उत्सव




ऑगस्ट १९६०



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★


आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

**५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई**
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनी तयार केलेले श्री साईबाबांचे तीन रंगी चित्र, द्वारकामाई व इतर एक रंगी फोटो—साईज १० × ८, १० × १४, १४ × २० व पोस्टकार्ड साइज खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री. सगुण मेरु नाईक**
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर


मुद्रक: शा. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४
संपादक व प्रकाशक : ना. आ. सावंत, ईस्ट अँन्ड वेस्ट

स्थापना १९१६



साईबाबांच्या

मूर्ती पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

## ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री साई वाक्सुधा

या नरदेहाचें महत्व अपरंपार आहे. नरदेह निर्माण करून ईश्वराला आनंद झाला. विवेक, वैराग्यादि गुणांची जोड त्याच्याठायीं झालेली आहे. त्यांमुळें त्याचें लक्ष माझ्याकडे लागून तो माझ्या भजनांत दंग होईल व स्वतःचा उद्धार करून घेईल. हा मनुष्यदेह नाश पावणारा विनाशी आहे; परंतु साधनसंपन्न माणूस अविनाशी होऊं शकतो. नराला नारायण होतां येतें. या जगांत नरदेहासारखें साधनसंपन्न दुसरें कांहीं नाहीं. गारुडी हा मोठा चतुर असतो. तो आपलें चतुराईचे खेळ चतुरांसमोर करील. निदान आपलें कसब लोकांनीं जाणावें ही त्याची अपेक्षा असते. त्याचप्रमाणें भगवंतानें नाना वस्तुजात निर्माण करून त्यांच्याकडून तो खेळ करून घेत आहे. त्यानें केवढा ब्रह्मांडविस्तार निर्माण केला आहे; परंतु त्याची लीला जाणण्याची शक्ति फक्त मनुष्यप्राण्यांतच आहे. माझें ध्यान व माझें सतत चिंतन केल्यानेंच त्याला या जगाचें कोडें उलगडणार आहे. जेव्हां मनुष्य हें सर्व जाणून घेईल तेव्हांच आपला खेळ यशस्वी झाला असें भगवंताला वाटेल.

— श्रीसाईसच्चरित

---

# श्रीसाईलीला


[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३८ वें ]　　ऑगष्ट १९६०　　[ अंक ५ वा

: संपादक :

**नागेश आत्माराम सावंत**

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. २५१२७४

: कार्यालय :

**ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १**

# प्रिय वाचक—

श्रद्धेचें सामर्थ्य अमर्याद आहे. ज्यानें तो गुण संपादन केला त्याला या जगांत अशक्य अशी कोणतीहि गोष्ट नाहीं. ईश्वरप्राप्ति ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. या जीवनांत मिळविण्यासारखें महत्तम असें जर कांहीं असेल तर तेंच होय. परंतु ज्यांनीं ज्यांनीं श्रद्धेची कांस धरली त्यांना ईश्वरप्राप्ति झालेली आहे.

परंतु ही श्रद्धा विवेकी असावी. अविवेकी किंवा भोळी–आंधळी श्रद्धा कामाची नाहीं. जेथें अज्ञान आहे, तेथेंच आंधळी श्रद्धा संभवते. अज्ञानाचें व आंधळेपणाचे जसें सख्य आहे, तसेंच ज्ञानाचें व विवेकी श्रद्धेचें आत्यंतिक सख्य आहे. आणि यासाठींच आपण ज्ञानाची उपासना केली पाहिजे. केवळ अज्ञानापायीं आज आपल्यासभोंवार व जगांत नाना प्रकारचे घोटाळे माजलेले आहेत.

नुकतांच गुरुपौर्णिमा आली व गेली. आपल्या अंतःकरणांत जो अज्ञानरूपी अंधकार भरलेला आहे तो नाहींसा करून त्याजागीं ज्ञानसूर्याचा उदय घडवून आणणारा म्हणजे सद्गुरुच होय, त्याला शरण गेलें पाहिजे. अनन्यभावें त्याची सेवा केली पाहिजे. हाच गुरुपौर्णिमेचा संदेश आहे. दर वर्षी याच संदेशाची संवेदना करून देण्यासाठीं गुरुपौर्णिमा येत असते.

श्रीसाईबाबा हेच आपले सद्गुरु होत. आपण त्यांचे अनुयायी व त्यांनीं दाखवून दिलेल्या मार्गानें जाणारे आहोंत. श्रीसाईसत्चरिताच्या रूपानें त्यांनीं अमूल्य व अनुकरणीय ज्ञानाचा ठेवा आपल्यामागें ठेविला आहे. त्यांनीं एका वाक्यांत जो महामंत्र देऊन ठेविला आहे, त्याचें मनन करून तो आचरणांत आणण्यासाठीं आम्हीं जर मनापासून झटलों तर आणखी कांहीं करण्याची जरूरी नाहीं.

‘ तूं मजकडे अनन्य पाहीं । पाहीन तुजकडे तैसाच मीही ।
माझ्या गुरूनें अन्य कांहीं । शिकविलें नाहींच मजलागीं ॥ ’

माझ्यावर दृढ श्रद्धा ठेवा. जें जें कराल तें तें माझ्या नांवानें करा व मला समर्पण करा. माझी आठवण नेहमीं ठेवा. माझ्याशीं तल्लीन होऊन जा. जगांतील साऱ्या गोष्टींचा विसर पडला तर पडूं दे; परंतु माझा विसर क्षणभरही पडूं देऊं नका. माझें भजन, गायन, चिंतन यापेक्षां दुसऱ्या कोणत्याही गोष्टीला महत्व देऊं नका. अशा प्रकारची अनन्यसाधारण भक्ति तुमच्याकडून घडली म्हणजे त्या भक्तीचें फळ त्याच मापांत नव्हे, तर सवाई दुप्पटीनें तुमच्या पदरांत पडेल, याची खात्री बाळगा.

बाबा एवढेंच सांगून थांबले नाहींत तर आपल्या गुरूनें आपणास याच्याशिवाय दुसरा गुरुमंत्र दिला नाहीं, असें आपणास निर्धारपूर्वक सांगत आहेत.

बाबांवर विवेकपूर्वक श्रद्धाभाव ठेऊन हें जीवनपुष्प सर्वस्वीं त्यांच्या चरणीं अर्पण करण्याचें भाग्य ज्यांच्या वांट्यास आलें त्यांनीं आपला जन्म सार्थकीं लाविला.

आज साईबाबा हें निस्सीम श्रद्धावंतांच्या मनकामना पूर्ण करणारें दैवत होऊन राहिलें आहे. ठायीं ठायीं असे अनुभव घेतलेलीं माणसें आढळून येत आहेत व त्यांचें अनुभवें श्री साईलीलेंतून वेळोवेळीं प्रसिद्ध होत आहेत; परंतु त्याहीपेक्षां प्रकाशांत न आलेले भक्तांचे अनुभव कितीतरी पटीनें अधिक आहेत.

श्री साईबाबा हें निस्सीम भक्तिभावाला वश होणारें दैवत आहे आणि म्हणून त्या दैवी गुणाचा फायदा लुटण्यासाठीं स्वार्थी लोक त्या भक्तिभावाचा स्वतःच्या फायद्यासाठीं 'बाजार' मांडूं लागले आहेत, ही खरोखर अत्यंत खेदजनक गोष्ट आहे.

हा भक्तीचा बाजार परोपरीनें मांडला जात आहे व साईभक्तांच्या भोळ्या भावाचा फायदा करून घेण्यासाठीं नाना युक्त्या लढविल्या जात आहेत. परंतु ज्यांच्यापाशीं विवेकी श्रद्धेचें बळ आहे ते बाबांनीं दाखवून दिलेल्या मार्गाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें जाणार नाहींत. कोणी कितीहि चाळवाचाळव करो; आम्ही बाबांच्या भक्तीचा जो मार्ग एकदां स्वीकारला, त्याच मार्गानें आपण जावयाचें आहे; कारण बाबांनीं आपल्या ह्यातींत दाखवून दिलेला मार्ग त्यांच्यामागेंहि तोच आपलें संकटांतून रक्षण करणारा आहे. 'नान्य पंथः'—आमच्यापुढें तोच एकमेव मार्ग. त्याविना दुसरा मार्ग नाहीं, हें त्रिवार सत्य आहे.

— **संपादक**

---



नोकरी करणें म्हणजे कांहीं स्वावलंबन नव्हे; उलटपक्षीं त्यांत किती तरी परावलंबनाचा भाग असतो. स्वावलंबन म्हणजे कोणत्याहि बाबतींत कोणावरहि अवलंबून रहावयाचें नाहीं. दुसऱ्यावर कमीत कमी भरिभार टाकावयाचा. आपल्या घरांत नोकर चाकर ठेवतां यावे म्हणून आपण दुसऱ्याची नोकरी चाकरी करावयाची, हें का स्वावलंबन झालें ?'

—**डॉ. राजेंद्रप्रसाद.**




****************** संकलक : आमचे प्रतिनिधि *******************

शिरडी येथील श्री गुरुपौर्णिमा उत्सव गेल्या महिन्यांत प्रतिवर्षीप्रमाणें थाटामाटांत साजरा झाला; परंतु बाबांच्या प्रेरणेनें सुमारें पन्नास वर्षांपूर्वी या उत्सवाची सुरवात कशा परिस्थितींत झाली याचा पूर्वेतिहास श्रीसाईलीलेच्या गेल्या गुरुपौर्णिमा अंकांत देण्याची इच्छा असूनहि जागेच्या अभावीं तें शक्य झालें नाहीं. या उत्सवाचा बाबांच्या विविध लीलांशीं संबंध असल्यामुळें त्या तत्कालीन लीलांचीहि माहिती आमच्या वाचकांसाठीं येथें देण्याचा विचार आहे.

## नास्तिक तात्यासाहेब नूलकर

१९०९ सालची गोष्ट आहे ही. श्री. तात्यासाहेब नूलकर हे मागाहून बाबांचे परम व निष्ठावान् भक्त झाले असले तरी तत्पूर्वी त्यांचा साधुसंतांवर व देवावर विश्वास नव्हता. हें सब झूट है असें मानणारे ते एक नास्तिक गृहस्थ होते. बाबांच्या भेटीसाठीं आस्तिक येत असत, त्याचप्रमाणें केवळ कुतूहल म्हणून नास्तीकही येत असत.

श्री. नानासाहेब चांदोरकर हे बाबांचे परम भक्त. त्यांची बाबावर परमनिष्ठा. ध्यानीं मनीं बाबा. जो भेटेल त्याच्याजवळ बाबांचें गुणगान व शिरडीस जाण्याचा आग्रह. प्रत्येकानें आपलें कल्याण साधावें, हाच त्यामध्यें त्यांचा हेतु असे. तो हेतु साध्य होवो न होवो. त्यांचा आग्रह सतत चालू असावयाचा. नानासाहेब हे पंढरपूर येथें मामलेदार असतां श्री. तात्यासाहेब नुलकर हे तेथें मुनसब होते. ते नास्तिक असले तरी भेट झाली म्हणजे नानासाहेबांचें त्यांच्या मार्गे नेहमीं लकडें असे कीं, 'शिरडीला चला व साईबाबांचें दर्शन घेऊन पुण्य पावन व्हा.' तात्यासाहेबांच्या नकारानें नानासाहेब निराश होत नसत. उलट त्यांचा उत्साह दुणावत असे. महिनेच्या महिने आणि वर्षेच्या वर्षें हा प्रकार चालू होता.

नानासाहेबांचा पूर्ण विश्वास होता कीं, तात्यासाहेब कितीही पाखंडी व नास्तिक असले तरी एक दिवस असा उजाडेल कीं, ज्या दिवशीं तात्यासाहेबांचा नास्तीकपणा लयाला गेलेला असेल व तो जावा अशी त्यांची मनापासून इच्छा होती.

## नानासाहेबांचा आग्रह

'ती माझी बाजू नव्हे; माझें त्या गोष्टीकडे लक्ष नसतां तुम्हीं उगाच कां माझ्यामागें हात धुवून लागतां ? मला शिरडीला यायचें नाहीं हें कितीदां सांगूं तुम्हांला ?' असें

एके दिवशीं तात्यासाहेब वैतागून म्हणाले. तरी नानासाहेब चांदोरकरांनीं त्यांचा पिच्छा सोडला नाहीं.

परंतु कर्मधर्मसंयोग मोठा विचित्र असतो. एक दिवस असा उजाडला कीं तात्यासाहेब म्हणाले ' हें पहा ? नानासाहेब ! तुमचा फार दिवस आग्रह चाललेला आहे. तो ऐकून ऐकून मी कंटाळलों आहे. तेव्हां तुमच्या इच्छेखातर मी शिरडीला येतों. परंतु तत्पूर्वी माझ्या २/३ अटी आहेत, त्या पूर्ण कराव्या लागतील. '

नानासाहेबांस आनंद झाला. जो गृहस्थ शिरडीचें नांव घ्यायला तयार नव्हता तो कांहीं अटींवर का होईना, यायला तयार झाला, हें कांहीं कमी महत्त्वाचें नव्हतें.

" बरं बुवा ! सांगा पाहूं अटी काय त्या ! " नानासाहेबानीं मोठ्या उत्कंठेनें विचारलें.

" माझी पहिली अट म्हणजे स्वयंपाक करण्यासाठीं सध्या माझ्याजवळ ब्राह्मण नाहीं तो मला मिळवून द्या. त्याशिवाय मला बाहेर पडतां येणार नाहीं. दुसरी अट म्हणजे मी शिरडीस आल्यावर बूट पाटलोण काढल्याशिवाय तुमच्या बाबांसमोर येईन व त्यांना नमस्कार बिमस्कार कांहींएक करणार नाहीं. केवळ एक चैनीखातर सहल म्हणून येईन. बोला, आहे कबूल ? "

' अगदीं कबूल ! परंतु या म्हणजे झालें, केव्हां जायचें तो दिवस लौकरच ठरवूं या '—असें सांगून नानासाहेबांनीं त्यांचा निरोप घेतला.

## ब्राह्मणाचें आकस्मिक आगमन

पुढें काय काय गोष्टी कसकशा घडत गेल्या त्या पहा ! स्वयंपाकासाठीं ब्राह्मण हवा होता. त्याच दिवशीं सायंकाळीं नानासाहेबांकडे एक ब्राह्मण स्वयंपाक्याची नोकरी मागण्यासाठी आला. त्यांना त्याची जरूरी नव्हती; परंतु तात्यासाहेबांस होती. त्यांनीं चिठी देऊन त्याला तात्यासाहेबांकडे पाठविलें. त्यांना तो ब्राह्मण पसंत पडून त्याला नोकरीस ठेविलें.

या ठिकाणीं तात्यासाहेबांस पहिला छोटासा धक्का बसला. मी आचाऱ्याची मागणी करावी व त्याचा उदय आजच व्हावा, हें कसें काय ?

शिरडीला जाण्याचा दिवस मुक्रर झाला. तो दोघांच्याहि मतें ठरला. परंतु पुन्हां एकाएकीं एक विघ्न उद्भवलें. विघ्न म्हणा कीं कांहीं म्हणा तें उद्भवलें खरें ! तात्यासाहेब म्हणाले, शिरडीस नेण्यासाठीं मला नागपुरी उत्तम संत्रें मिळालीं पाहिजेत. तीं मिळाल्याशिवाय मला जावेंसें वाटत नाहीं !

आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे दुसऱ्या दिवशीं सकाळीं तात्यासाहेब आपल्या घराचा दरवाजा उघडतात तोंच दरवाजाजवळ उत्तम नागपुरी संत्र्यांचा करंडा कोणीतरी आणून ठेवलेला होता. पार्सल कसलें तें प्रथम त्यांना समजणें शक्य नव्हतें. उघडून पहातां आंत उत्तमोत्तम १०० संत्रें आढळून आलीं.

हा तात्यासाहेबांस बसलेला धक्का नंबर दोन.

बाबा ही साधीसुधी व्यक्ति नाहीं, असें आतां तात्यासाहेबांस वाटूं लागलें. त्यांना आपोआप शिरडीची ओढ लागली. त्यांनीं संन्यांच्या पार्सलांची गोष्ट नानासाहेबांस सांगितली व ती त्यांनीं शांतपणें ऐकून घेतली.

**'हे वेडबंबू कोण आणलेस ?**

शेवटीं हे दोघेही मित्र शिरडीस जाण्यासाठीं निघाले व शिरडींत येऊन पोहोंचले. मी बूटपाटलोणींतच बाबापुढें येणार असें म्हणणारे तात्यासाहेब डळमळले. त्यांचें त्यांनाच वाटूं लागलें कीं, आपण भलतेंच कांहीं तरी बोलून गेलों. त्यांनीं दर्शनास जाण्यापूर्वी बूट पाटलोण काढून ठेविली व शुभ्र धोतर नेसून ते नानासाहेबांबरोबर द्वारकामाईंत बाबांच्या दर्शनास गेले. त्यांच्यापुढें त्यांनीं भक्तिभावपूर्वक साष्टांग लोटांगण घातलें व हात जोडून उभयतां त्यांच्यापुढें उभे राहिले.

'अरे! हे वेडबंबू बरोबर कोण आणले आहेस आज?' बाबांनीं त्यांच्याकडे पहात नानासाहेबांस प्रश्न केला.

तो प्रश्न ऐकतांच नानासाहेब मनांतल्या मनांत दचकले. मी जें जें कांहीं बोललों तें बाबांना समजलें असावें. त्याशिवाय का ते असा प्रश्न एकदम करतील!

तात्यासाहेबांचें मन हेलकावे खाऊं लागलें होतें. नास्तिकतेची नशा अजून साफ उतरली नव्हती. मनांत गोंधळ उडून गेलेला होता. त्यांच्या जीवनांतील तो महत्वाचा व क्रांतिकारक क्षण होता. आपल्या मनाची ही स्थिति त्यांनीं मित्रत्वाच्या नात्यानें नानासाहेबांस बोलून दाखविली.

त्यावर नानासाहेब म्हणाले, 'कांहीं चिंता करूं नका; बाबा परम दयाळू आहेत. तुमचें सारें शंकानिरसन करून ते तुम्हांला योग्य मार्गावर आणून ठेवतील. त्यांना सर्वांची चिंता आहे!'

**बाबांचा नृसिंहावतार**

नानासाहेबांनीं आश्वासन दिलें असलें तरी तात्यासाहेब नुलकरांची बेचैनी कमी झाली नाहीं. पुन्हां दुसऱ्या दिवशीं सकाळीं ते नानासाहेबांबरोबर द्वारकामाईंत बाबांच्या दर्शनासाठीं गेले असतां बाबांनीं नृसिंहावतार धारण केला. त्यांनीं तात्यासाहेबांना नानाप्रकारच्या शिव्या देऊन त्यांचा उद्धार केला. एवढेंच करून न थांबतां ते मारण्याचाहि आव आणूं लागले. तुझा सत्यानाश होईल असें म्हणून बाबांनीं त्यांचें डोकें तेथील खांबावर आपटलें! व येथून चालता हो म्हणून सांगितलें. बाबांचा रुद्रावतार पाहून बहुतेकांनीं तेथून आस्ते आस्ते काढता पाय घेतलेला होताच. आतां दुःखीकष्टी अंतःकरणानें तात्यासाहेबहि तेथून निसटले ते बिऱ्हाडीं आले. त्यांनीं नानासाहेबांस सारी हकीगत सांगून बाबांचा शाप बाधल्याशिवाय रहाणार नाहीं असें म्हणाले; परंतु नानासाहेबांनीं त्यांची समजूत घातली. ते म्हणाले, 'सत्यानाश होणार नाहीं, घाबरूं नका. तुमच्यांतील पापांचा, दुर्गुणांचा सत्यानाश होईल

असा त्याचा अर्थ आहे. बाबा कधीं कोणाचें अकल्याण करीत नाहींत. तुमच्या कल्याणाचा मार्ग त्यांनीं मोकळा करून दिलेला आहे. तुम्हीं घाबरण्याचें बिलकुल कारण नाहीं.'

## पानतंबाखू खाण्याची तलफ

त्याच रात्रींची गोष्ट. तात्यासाहेब रात्रीं दोन वाजतां एकाएकीं जागे झाले. त्यांना एकाएकीं तंबाखू खाण्याची तलफ आली. पानाशिवाय चुनातंबाखू खाण्याची त्यांना सवय नव्हती. आणि पान तर जवळपास नव्हतें. शेजारी नानासाहेब निजले होते. त्यांना उठविलें. ते तरी पान त्यावेळीं कुठून देणार? शिवाय त्यांना पान खाण्याची सवय नव्हती.

तात्यासाहेबांची तलफ थांबेना. ते म्हणाले, 'कसेंही करा; कुठून तरी पान घेऊन या हो!'

'भलतेंच काय मागणें? यावेळीं कुठून आणूं मी पान. झोपा पाहूं स्वस्थपणें!'

नानासाहेब असें म्हणताहेत तोंच द्वारकामाईतून एक इसम चार पानांचा विडा घेऊन आला व दरवाजा ठोठावूं लागला. दरवाजा नानासाहेबानींच उघडला व समोरच्या इसमास 'यावेळीं इथें काय?' म्हणून सरळ प्रश्न केला. तो म्हणाला,'बाबांनीं मला पानें देऊन येथें पाठविलें आहे. साठे यांच्या वाड्यांत एका गृहस्थास पान तंबाखू खाण्याची लहर लागली आहे तेव्हां तांतडीनें तेथें जा असें ते म्हणाले, म्हणून मी येथें धांवत आलों. हा विडा घ्या व ज्यांना त्याची जरुरी आहे त्याला द्या म्हणजे झालें. माझें काम झालें. मी जातों आतां.'

तात्यासाहेब हें सारें ऐकत होते. त्यांना यावेळीं बसलेला हा चमत्काराचा सर्वांत मोठा धक्का होता. झालें. त्यांचा नास्तिकपणा पूर्ण लयाला गेला. बाबांवर त्यांची संपूर्ण श्रद्धा बसली, बाबा प्रत्यक्ष परमेश्वर आहेत. अंतर्ज्ञानी आहेत, त्यांची शक्ति अपार आहे. याबद्दल त्यांची खात्री झाली.

तिसऱ्या दिवशीं सकाळीं तात्यासाहेब द्वारकामाईत गेले तेव्हां बाबा त्यांना म्हणाले, "तात्या, उद्यां त्या खांबाची पूजा कर."

"बरें आहे!" असें म्हणून बिऱ्हाडीं आले व त्यांनी घडलेली गोष्ट माधवरावांस (शामा) सांगितली.

ती ऐकून माधवराव द्वारकामाईत गेले तेव्हां बाबा त्यांनाही तेंच म्हणाले. परंतु ते म्हणाले,'खांबाची पूजा कां म्हणून करायची! आम्हीं तुमची पूजा करूं. प्रत्यक्ष देव आमच्यापुढें असतां खांबाची पूजा कां म्हणून करायची!'

परंतु बाबांनीं आपला आग्रह कांहीं सोडला नाहीं. त्यानंतर तात्याबा पाटील कोते दर्शनासाठीं गेले. त्यांनाही बाबा तेंच म्हणाले. ते तसेच माधवरावांकडे आले. सर्व एकत्र जमले. उद्यां त्या खांबाची पूजा करा म्हणून बाबा प्रत्येकास कां सांगतात, याचा विचार सुरू झाला. उद्यां आहे तरी काय? पंचांग तरी काढून पहा.

पंचांग उघडून पहाण्यांत आलें, दुसऱ्या दिवशीं गुरुपौर्णिमा होती. सर्वांना आश्चर्य वाटलें व आनंद झाला. बाबा पंचांग कधीं पहात नसत. असें असतां उद्यांच खांबाची पूजा करायला सांगतात. याचा अर्थ काय? आपल्या भक्तांकडून त्यांना पूजा घ्यायची असावी असा सर्वांनीं तर्क केला.

नंतर माधवराव द्वारकामाईंत गेले व "उद्यां आम्हीं तुमचीच पूजा करणार" असें सांगूं लागले.

"मर्जी तुमची!" एवढेंच बाबा म्हणाले.

आणि दुसऱ्या दिवशीं म्हणजे गुरुपोर्णिमेच्या दिवशीं सर्वांनीं बाबांची षोडषोपचारें पूजाअर्चा केली; व तेव्हांपासून दरसाल गुरुपोर्णिमेच्या दिवशीं उत्साहपूर्वक व भक्तिभावपूर्वक बाबांची पूजा करण्याची वहिवाट सुरू झाली.

---

संपत्ति हातावेगळी होण्याचे तीन मार्ग आहेत. धर्मादाय करणें, उपभोग घेणें व कोणत्या ना कोणत्या कारणानें नाश होणें. जो संपत्तीचा विनियोग दानधर्मासाठीं करीत नाहीं किंवा स्वतःही तिचा उपभोग घेत नाहीं त्याची संपत्ति कोणत्या ना कोणत्या कारणांनीं नाश पावते.

— भर्तृहरी

लहान मुलाच्या आंकडीवर
जुनें आणि प्रसिद्ध औषध
जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी
सोल प्रो. जयकर ब्रदर्स
६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १
: स्टॉकिस्ट :
कांचनलाल वाडीलाल कं.
दवाबझार, मुंबई २

अर्नाळकर ब्रदर्स
चष्म्यांचे व्यापारी
आमच्या येथें डोळ्यांची मोफत तपासणी करून शास्त्रोक्त चष्मे वेळेवर तयार करून देण्यांत येतील. सर्व प्रकारच्या फ्रेम्स् व कांचा मिळतील. एकदां आमच्या दुकानीं आल्यानंतर तुम्हीं आमचे कायमचे ग्राहक बनाल.
: मालक :
बाबूराव अर्नाळकर
२५५ गिरगांव रोड,
सरकारी तबेल्यासमोर, मुंबई ४
वि. सू:—श्रीसाईभक्तांसाठीं खास सवलतीचे दर

# आमची दानधर्माची कल्पना

**********************************

दानधर्मासंबंधीं आमच्या कल्पना किती विचित्र असतात! आम्हीं नांवासाठीं, किर्तीसाठीं व आपली भरपूर जाहिरात व्हावी म्हणून दानधर्म करतों किंवा देणग्या वगैरे देतों! परंतु तें खरें दान नव्हे; मग खरा दानधर्म कोणता?

जो दानधर्म देखाव्यासाठीं केला जातो, त्याला आदर्शदान केव्हांहि म्हणतां येणार नाहीं.

जो दानधर्म किर्तीच्या लोभानें केला जातो त्यालाहि आदर्शदान म्हणतां येणार नाहीं.

जो दानधर्म शक्य तेवढा गाजावाजा करून केला जातो, त्यालाहि आदर्शदान म्हणतां येणार नाहीं.

जें कोणालाहि समजूं न देतां गुप्तरूपानें दिलें जातें, अंतःकरणांतील स्वाभाविक दयाभाव उत्पन्न झाल्यामुळें अंतःप्रेरणेनें दिलें जातें व जें या हाताचें त्या हातालाहि दखल होत नाहीं तें आदर्शदान होय; परंतु आजकाल जगांत आपण काय पहात आहोंत? दानाची जाहिरात झळकली पाहिजे! त्याचें अवडंबर माजविलें गेलें पाहिजे, वर्तमानपत्रांतून व अहवालांतून त्याचे नगारे पिटले गेले पाहिजेत! गुप्तदान ही आजकाल अत्यंत दुर्मिळ गोष्ट होऊन राहिली आहे!

**नारायणशेटींचा दानधर्म**

एका नगरांत नारायणशेट या नांवाचे एक लक्षाधीश शेटजी रहात असत. त्यांचा व्यापार धंद्याचा व्याप फार मोठा, तसाच विविध प्रकारचा होता. दानधर्माकडेही त्यांचा ओढा होता. जशी आवक मोठी तसाच दानधर्मही मोठा! नगरशेट या नात्यानेंही त्यांचा मान व दर्जा मोठा होता. त्यांच्याकडे आलेला कोणीही याचक मोकळ्या हातांनीं परत जात नसे. त्यांची पत्नी सौ. यमुनाबाई हीहि पतीच्या पावलांवर पाऊल टाकून चालणारी होती. तिनें कधींही तोंड वांकडें केलें नाहीं. पतीराज करतील तें प्रमाण व त्यांतच संतोष!

माणसाचें नशीब किंवा दैव ही एक और चीज आहे. दैवाचा फांसा कधीं उलट तर कधीं सुलट पडत असतो. सर्वच दिवस कांहीं सारखे नसतात. कधीं चलती तर कधीं पडती...कधीं आघाडीवर तर कधीं एकदम पिछाडीस! जगाचें रहाटगाडगें हें असें चाललेलें आहे.

**पडता काळ**

नारायण शेटजींना व्यापारधंद्यांत खोट येऊं लागली. व्यापाराचें एकेक अंग अंगावर येऊं लागलें. नुकसानीचें चक्र गरगर फिरूं लागलें! बुडत्याचा पाय

खोलांत. देण्याचा डोंगर वाढत चालला व येणें थकत चाललें. कर्जबाजारीपणा वांट्यास आला. तशा स्थितींत त्या नगरांत रहाणें धोक्याचें व अपमानास्पद होतें. घरांतील दागदागिने, भांडीकुंडीं, चीजवस्तु व घरदार, तसेंच जवळ जें जें म्हणून कांहीं होतें तें सारें विकून टाकून नारायण शेटींनीं कर्जबाजारीपणांतून कशीबशी आपली एकदांची सुटका करून घेतली व ज्या नगरींत मानसन्मानानें जीवन घालविलें, त्या नगरीला एके दिवशीं पहांटेच्या प्रहरीं त्यांनीं रामराम ठोकला व आपल्या खेडेगांवीं प्रयाण केलें.

खेड्यांत खर्च कमी व कसेंहि राहिलें तरी विचारतो कोण? याच गांवांतून त्यांचे वाडवडील व्यापारधंद्यानिमित्त व नशीब काढण्यासाठीं बाहेर पडले होते. नशीब उदयास आलें. कांहीं काळ टिकलें व एक दिवस त्याच नशिबानें दगा दिल्यामुळें परत गांवीं हात हालवीत येऊन पूर्व स्थितींत रहावें लागलें!

गावीं आल्यानंतर चिंतेमुळें व अति श्रमामुळें नारायणशेट आजारी पडले. दुष्काळांत तेरावा महिना! संकटें येऊं लागलीं म्हणजे तीं अशीं येतात. त्यांना अंत ना पार! जवळ जें कांहीं शिल्लक राहिलें होतें आणि तें फार थोडें होतें-तें सारें आजारीपणांत खर्च झालें! नारायणशेट या आजारपणांतून उठले हेंच नशिब! यमुनाबाई त्यांचं पथ्य-पाणी प्रयत्नेंकरून संभाळीत होती. तिला कष्ट करण्याची माहिती नव्हती. राजेशाही थाटांत तिचा जन्म गेलेला. परंतु आतां पोटासाठीं गांवांत मोलमजुरी, दळणकांडण करण्याचें तिच्या नशिबीं आलें! बिचारी दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडली!

**एका याचकाचें आगमन**

नारायणशेटीना अशक्तपणामुळें कांहीं करतां येत नव्हतें. दिवस रात्र त्यांनीं खाटेवर पडून रहावें. गतकाळची आठवण करावी व त्या काळाची चालू काळाशीं तुलना करावी. 'ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें.' या पलिकडे समाधानाला त्यांच्यापाशीं कांहीं नव्हतें.

त्या सुमारास त्या गावीं कोणी एक गरीब ब्राह्मण आला. त्याची एक विवाहयोग कन्या होती. तिच्या विवाहासाठीं त्याला पैशाची जरूरी होती. चार लोकांकडे हात पसरून काय मिळेल तें पदरांत घ्यावें व लग्नाच्या काळजींतून मोकळे व्हावें, हीच त्याची आकांक्षा होती.

प्रत्येक गावांत दुष्ट व मत्सरी वृत्तीचे थोडेबहुत लोक असतात. दुसऱ्याची चेष्टा करणें, पाणउतारा करणें व दुःखावर डागण्या देऊन त्यांत संतोष मानणें यांत त्यांना भूषण वाटत असतें. दुर्दैवानें त्या ब्राह्मणाची प्रथम गांठ पडली ती अशा लोकांशीं. एका काळचे उदार परंतु आतां सारें गमांवून गांवीं आलेले नारायण शेटजी यांच्याकडे त्यांनीं बोट दाखविलें. 'आमच्या गांवांत नारायणशेट हे धनवान्, तसेच मोठे उदार गृहस्थ आहेत. ते एकटेच तुझें दारिद्य दूर करतील!' अशी त्यांनीं थाप ठोकून दिली!

त्यांचा कावा त्या बिचाऱ्या भोळ्या ब्राह्मणाला काय माहीत! त्याच्या तोंडाला पाणी सुटलें आणि तो नारायणशेटींच्या घरीं मोठ्या आशेनें गेला.

त्यावेळीं नारायणशेटजी खाटेवर विव्हळत पडले होते. ब्राह्मणानें मोठा धीर करून आपल्या आगमनाचें कारण सांगितलें व तें ऐकून शेटजींच्या नेत्रांवाटे घळघळ अश्रुप्रवाह सुरू झाला. ते समजले कीं, ही गांवांतील जातवाल्यांची दुष्ट कारवाई आहे! त्या जाणीवेनें त्यांना पराकाष्ठेचें दुःख झालें.

## ब्राह्मणानें ओळखलें

ब्राह्मणानें सारा प्रकार ओळखला. घरांत आरपार पहात असतां त्याला ठायीं ठायीं दारिद्र्याची घनदाट छटा आढळून आली. अधिक वेळ बसण्यांत अर्थ नाहीं हें ताडून तो ब्राह्मण निरोप घेऊन जाऊं लागला तेव्हां शेटजी म्हणाले, "नका जाऊं थांबा जरा; घरधनीण येईल इतक्यांत; पाहूं या कांहीं जमतें का!"

ब्राह्मण मोठ्या कष्टानें थांबला. तेथें येण्यांत आपल्याकडून घोडचूक घडली हें तो समजून चुकला; परंतु त्याचा काय दोष होता त्यांत!

इतक्यांत यमुनाबाई आल्या. त्यांनीं पतिराजांचा दुःखीकष्टी चेहरा व शेजारीं कावऱ्याबावऱ्या स्थितींत बसलेला तो ब्राह्मण पाहिला. त्या जें कांही समजायचें तें समजल्या. त्या साध्वीपाशीं आतां कांहीं शिल्लक राहिलें नव्हतें. दोन हातांत दोन सोन्याच्या बांगड्या सौभाग्यालंकार म्हणून राखून ठेवलेल्या होत्या. प्रसंग ओळखून त्यांनीं त्या बांगड्या काढून ब्राह्मणाच्या हातावर ठेविल्या!

ब्राह्मण सद्गदित झाला. म्हणाला, 'नाहीं! नाहीं! मला माणुसकी आहे. मी दरिद्री असलों तरी तुमच्या हातीं शिल्लक राहिलेल्या या शेवटच्या भाग्यवान बांगड्या घेऊन जाण्याइतका मी अधम नाहीं. ठेवा त्या, देव तुमचें भलें करो! माझें काम होईल कुठं तरी! माफ करा. माझ्यामुळें कष्ट झाले तुम्हांला!' असें म्हणून व उभयतांस आशिर्वादपूर्वक नमस्कार करून तो ब्राह्मण; जाऊं लागला, तेव्हां उभयतांनींहि त्याला प्रेमळ आग्रह करून व परोपरीनें त्याची समजूत घालून त्या बांगड्या त्याच्या पदरांत बांधल्या व त्यांचा आग्रह व निग्रह जाणून ब्राह्मणानेंहि नंतर आढेवेढे घेतले नाहींत.

अंतःकरणपूर्वक आशीर्वादांचा वर्षाव करीत तो ब्राह्मण आपल्या घरीं गेला व व आपल्या कन्येचें लग्न त्यानें यथोचित थाटांत उरकलें.

तो ब्राह्मण कसला? ब्राह्मणाच्या रूपानें नारायणशेटजींचें सत्त्व पहाण्यासाठीं भगवंतच ब्राह्मणाच्या रूपानें आले होते असें म्हणावेसें वाटतें; कारण त्यानंतर नारायणशेटजींच्या तब्येतींत झपाट्यानें सुधारणा होऊं लागली. जीव सलामत तो पगडी पचास! प्रकृति नीट पाहिजे; मग मनुष्य काय वाटेल तें करूं शकतो. नारायणशेट खाटेला खिळून राहिले होते, ती खाट सुटली आणि ते आतां हिंडूं फिरूं लागले.

× × ×

## पुण्यसंचय प्रगट करणारें यंत्र

इकडे ज्या नगरीचे नारायणशेट हे एकाकाळीं नगरशेट होते, त्या नगरीचे वृद्ध राजेसाहेब निधन पावले व तरुण राजपुत्र गादीवर आले. त्यांच्या धाकट्या बहिणीला

कोणी एका योग्यानें दोन गमतीचीं यंत्रें दिलीं. त्यांतील एका यंत्रानें आपल्याजवळ किती पुण्यसंचय झाला आहे हें समजत असे व दुसऱ्या यंत्रानें आपल्या बाजूला पुण्य किती आहे व तें कोणतें हें आरशांत पहातां येत असे. राजकन्येनें असें जाहीर केलें कीं, ज्या कोणाला आपलें पुण्य विकायचें असेल त्यानें तें खुशाल विकावें. तें घेण्याची आमची तयारी आहे.

नारायणशेटजींच्या कानीं ती घोषणा आली. त्यांना आपल्या जुन्या वास्तव्याची आठवण झाली. इतक्या वर्षांनंतर आपणांस ओळखणारे कोण असणार त्या नगरींत ! एकदां जाऊन गांठीला जो कांहीं पुण्यांश सांचला असेल तो विकून चार पैसे घेऊन यावे व आपल्यामागें पत्नीची कांहीं तरी सोय करून ठेवावी, असें त्यांच्या मनानें घेतलें.

यमुनाबाईजवळ त्यांनीं पुण्य विकण्याची गोष्ट काढली तेव्हां तिनें साफ नकार दिला; परंतु नारायणशेटजींचा हट्ट पाहून तिनें माघार घेतली व जाण्यास अनुज्ञा दिली.

नारायणशेट जायला निघाले. वाटेंत भूक लागेल तेव्हां तोंडांत टाकण्यासाठीं जवळ कांहीं तरी असावें म्हणून यमुनाबाईनें एक गुळाचा खडा व थोडें बऱ्याचें पीठ रुमालांत बांधून दिलें.

पायीं प्रवास करीत असतां दुपारची वेळ झाली. पोटांत कावळे कुरकुर करूं लागले. तेव्हां एका झाडाच्या व तलावाच्या आश्रयाला येऊन त्यांनीं मुक्काम ठोकला. विश्रांति घेतल्यानंतर स्नान उरकून क्षुधा निवारणार्थ एका वाडग्यांत तें पीठ कालवून त्यांत गूळ घातला व त्याचे लाडू बनवून ते तोंडांत टाकणार तोंच शेपटी हालवीत हालवीत एक कुत्रा तेथें आला. तोही भारी भुकेलेला दिसत होता. नारायणशेटजींना त्याची दया आली. त्यांचें अंतःकरण कळवळलें. तीन लाडू तयार झाले होते. ते एकामागून एक सर्व कुत्र्याच्या पोटांत गेले. मागें शिल्लक काय राहिलें ? थंडगार पाणी ! तें समाधानपूर्वक घटाघट पिऊन नारायणशेटजींनीं ती भुकेची वेळ मारून नेली.

### राजवाड्यांत आगमन

नारायणशेट तेथून नगरांत गेले व प्रथम त्यांनीं राजवाड्यांत प्रवेश केला. त्यांना राजकन्येला भेटायचें होतें व तीं यंत्रें पहायचीं होती आणि गाठीशीं असल्यास पुण्य विकायचें होतें.

राजकन्येची व त्यांची भेट झाली. त्यांच्या विनंतीप्रमाणें राजकन्येनें नारायण शेटजींना पुण्याची कल्पना देणारें यंत्र त्यांच्यापुढें ठेविलें. त्यावर हात ठेऊन नारायण शेटजींनी पूर्वकालीन अनेक गोष्टींची आठवण केली; परंतु त्या यंत्रानें जरासुद्धां हालचाल केली नाहीं. औदार्याच्या नाना गोष्टींची त्यांनीं आठवण केली, परंतु यंत्राचा कांटा जशाचा तसा होता. तो हालेचना.

नारायण शेटजी निराश झाले. आपण एवढी सत्कृत्यें केलीं तीं सारीं व्यर्थ गेलीं, याबद्दल त्यांना खेद वाटूं लागला.

राजकन्येनें त्यांचा उदासवाणा चेहरा पाहिला व धीर देऊन म्हणाली, " आतां या दुसऱ्या यंत्राच्या आरशांत पहा बरं. नांव लौकीक व्हावा, मानमान्यता

मिळावी म्हणून जो दानधर्म केला जातो तो खरा दानधर्म नव्हे; तो पुण्याच्या खातीं जमा केला जात नाहीं! कीर्ति व मानमान्यता मिळावी म्हणून ज्या गोष्टी आपण केल्या त्यांची नोंद येथें झालेली दिसणार नाहीं. आतां दुसऱ्या यंत्रांतील आरशांत पहा. निष्काम वृत्तीनें जें पुण्य केलें असेल तें त्याच स्वरूपांत या यंत्राच्या आरशांत आपणाला दिसेल!

नारायणशेट मोठ्या उत्कंठेनें त्या यंत्राच्या आरशांत पाहूं लागले तेव्हां आपली पत्नी हातांतील सोन्याच्या बांगड्या काढून ब्राह्मणाच्या हातीं देत आहे, तर दुसरीकडे एक कुत्रा आपण तयार केलेले वऱ्याच्या पिठाचे लाडू समाधानपूर्वक खात आहे, अशीं दोन दृश्यें त्यांना पहायला मिळालीं.

## दैवाचा कांटा फिरला

त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचें हास्य चमकलेलें दिसूं लागलें. राजकन्याही कुतूहल-पूर्वक डोकावून पाहूं लागली. तीही समाधानपूर्वक हंसली व म्हणाली,' शाबास शेटजी! ही तुमचीं पुण्यकृत्यें! तीं विकत देण्याची आपली आहे का तयारी? त्यासाठीं दोन लक्ष सुवर्ण मोहरा देण्याची माझी तयारी आहे!"

खऱ्या दानधर्माची आतां नारायणशेटजींना बरोबर कल्पना आली. ते म्हणाले, "माफ करा! हीं दोन्हीं पुण्यें केवढीही मोठी रक्कम आपण मला दिली तरी तीं विकण्याची माझी तयारी नाहीं!"

"बरें आहे! मग दहा लक्ष सुवर्ण मोहरा घ्या., परंतु तीं पुण्यकृत्यें मला विकत द्या!" राजकुमारी म्हणाली.

' नाहीं, नाहीं, तीं पुण्यकृत्यें मी कोणत्याहि अपेक्षेनें केलीं नाहींत. दहा लक्ष कां दहा कोटी मोहोरा माझ्यापुढें ओतल्या तरी मी तीं देणार नाहीं. त्यांची मुळीं किंमतच होऊं शकत नाहीं?"

इतक्यांत नवे व तरुण राजेसाहेब तेथें आले. त्यांनीं नारायणशेटजींना तात्काळ ओळखलें व म्हणाले, 'शेटजी मी गेल्या कांहीं दिवसांपासून आपल्या तपासांत आहें. बरं झालं येथें भेट झाली तें! माझ्या वडिलांवर तुम्ही किती तरी उपकार केले आहेत. अडीअडचणींच्यावेळीं लक्षावधि मोहोरा आपण आमच्या खजिन्यांत भरणा केल्या आहेत. आपल्या नांवें कमीत कमी दहा लक्ष मोहरा आमच्याकडे जमा आहेत. त्या वाटेल तेव्हां घेऊन जा व आतां पूर्ववत् या नगरींत येऊन रहा, एवढीच विनंति आहे.'

नारायणशेटजींची दैवरेषा फिरली. ते पुन्हां नगरशेट झाले; परंतु त्यानंतरच्या काळांत जो जो दानधर्म त्यांनीं केला तो गाजावाजा होऊं न देतां केला. सच्चें दान कोणतें, याची त्यांना आतां जाणीव झालेली होती.

---

# शिवकालीन दोन विदेही

एकदां शिवाजी राजे एका पुराणास गेले होते. तेथें पुराणिक बुवांच्या तोंडून त्यांनीं ऐकलें कीं, पूर्वींच्या काळीं जसे अनेक मोठमोठे विदेही होऊन गेले, तसे हल्लींच्या काळीं कोणी राहिले नाहींत. या कलियुगांत विदेहीपणाच्या गोष्टी बोलणारे पुष्कळ आढळतील, पण विदेहीपणाचें आचरण करणारे औषधालाही मिळणार नाहींत.

पुढें भेटींत राजांनीं समर्थांनाच विचारलें, ' सांप्रत कोणी विदेही आहेत काय ? ' समर्थांनीं उत्तर दिलें, ' नसतीलच असें कसें म्हणतां येईल ? तुकाराम विदेही नाहींत असें कोण म्हणूं शकेल ? भेटा जाऊन त्यांना पहा, करा परीक्षा. '

राजे तुकाराम महाराजांकडे गेले, तों ते डोळे मिटून भजनांत दंग होऊन नाचत होते. श्रोते पुढें बसले होते. राजे आलेले पाहून श्रोत्यांत थोडी गडबड उडाली. ते बाजूस सरकले. राजांना पुढें वाट करून दिली. तुकारामांनीं डोळे उघडून पाहिलें, तों श्रोते दूर झालेले आणि राजे पुढें आलेले त्यांना दिसले. शिवाजीराजे कशासाठीं आले होते, हें ओळखून समर्थांना आठवून तुकाराम महाराज राजास म्हणाले, ' राजा अरे,

जो विदेहियांचा शिरोमणी । जया महायोगी ध्याती मनीं ।
चर्या जयाची न कळे म्हणोनि । देवहि तिष्ठती सभोंवते ॥
जे कथा निघाली विदेहप्रसंगीं । ते चिन्हें असती का समर्थ अंगीं ।
ते काय तुला, मी आहे तसा म्हणून आपण होऊन सांगतील ?
आपस्तुति नावडे साधुलागी । म्हणुनी कळविती परस्परीं ॥
कैची पुराणें पुराणीकपण । भ्रमिकासंगीं जासी ठकोन ।
मी रे जयाचें करित ध्यान । किर्तनीं नाचत होतों कीं ॥
त्या समर्थांचा म्हणविसी जनीं ।

तेव्हां तुला जास्त काय बोलूं? ' असें म्हणून तुकाराम महाराज डोळे मिटून श्रीसमर्थांचें ध्यान करीत भजनांत दंग होऊन नाचूं लागले !

तुकाराम महाराजांचे निर्भिड बोल ऐकून राजांच्या हृदयाचें पाणी झालें. तुकाराम महाराजांच्या गळ्यांत त्यांनीं मोत्यांचा हार घातला. त्यासरशीं.

मृत्युलोकीं आम्हां आवडतें परी । नाहीं येक हरिनामाविण ॥ १ ॥
सोनें रुपें धन मृत्तिकासमान । माणिक पाषाण खडे जैसे ॥ २ ॥

असें म्हणून तुकारामांनीं तो हार तोडून फेकून दिला.

राजे समर्थांकडे मुरडले. त्या भेटींत काय झालें असेल याची कल्पना करावी.

सांप्रत कोणी विदेही पुरुष आहेत काय या प्रश्नाचें प्रत्यक्ष उत्तर परभारें मिळावें म्हणून समर्थांनीं राजांना तुकाराममहाराजांकडे जाण्यास सांगितलें, तर तुकाराममहाराजांनीं उलट राजांना दोष लावून परत श्रीसमर्थांकडे पाठविलें ! असे एकमेकांना ओळखणारे दोन विदेही पुरुष त्या काळीं महाराष्ट्रांत नांदत होते.

× × ×

# वासना—रूप आणि परिहार

एकदां श्रीमहारुद्राच्या सन्मुख भोंवताली शिष्य घेऊन स्वामी समर्थ रामदास बसले असतां, एका शिष्यानें प्रश्न केला. "महाराज, वासना जिंकल्यावांचून जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटका नाहीं म्हणतात, त्या वासनेचें रूप कसें आहे व तिचा परिहार कसा करावा."

श्रीसमर्थ म्हणाले, "वासनेचें रूप संकल्पात्मक आहे, व ती कोणत्या तरी वस्तूवर अधिष्ठित असते. ती निव्वळ हवेंत नसते, तिला कसला तरी आधार लागतो. स्त्री, पुत्र, घरदार, शेतीवाडी, देश धर्म, समाज, बांधव, एखादें कार्य, एखादी संस्था इत्यादि अनेक वस्तु आहेत. एखाद्यावर प्रेम, कोणाचा द्वेष, असलें कांहीं ना कांहीं तरी अधिष्ठान वासनेला लागतें. जन्ममरणापासून सुटावयाचें तर जिवंतपणींच इतर वस्तूंवरील वासना काढून ती श्रीराम-समर्थ चरणीं जडवावी म्हणजे अंतकाळीं तीच वासना प्रबळ होऊन जीवात्म्याचें परमात्म्याशीं तादात्म्य होईल," अशा अर्थाच्या अभंगानेंच श्रीसमर्थांनीं शिष्याच्या प्रश्नाला उत्तर दिलें.

अंतीं पंच भूतें पांचाशीं मिळाली । वासना राहिली कोणें ठायीं ॥ १ ॥
कोणें ठायीं तेव्हां वासना हे राहे । कैसें रूप आहे वासनेचें ॥ २ ॥
वासनेचें रूप सुक्षम जाणावें । संकल्प स्वभावें रूप तिचें ॥ ३ ॥
रूप तिचें अंतकाळीं कोठें राहे । अनुभवें पाहें आपुलीयां ॥ ४ ॥
आपुला संकल्प जये वस्तूवरी । तेथें वसती करी वासना हे ॥ ५ ॥
वासना हे वस्ती करी अगोदर । जवं कळेवर सचेतन ॥ ६ ॥
सचेतन काया कारणीं लावावी । वासना गोवावी रामरूपीं ॥ ७ ॥
रामरूपीं सत्यसंकल्प धरावा । संसार तरावा अवलीळा ॥ ८ ॥
अवलीळा भवसार बोसरे । जरी मनीं धरे गुरुवाक्य ॥ ९ ॥
गुरुवाक्यें गती **रामदासीं** झाली । मुक्ति हे लाधली सायोज्यता ॥ १० ॥

प्रश्न किती गहन, पण त्याचें उत्तर किती सुलभ, सहज समजण्यासारखें दिलेलें आहे.

याच वासनेनें एकदां श्रीसमर्थांसारख्या संतांवरही आपला पगडा बसविला. त्या प्रसंगाची हकीगत फारच मजेदार पण उद्बोधक आहे.

समर्थांचा नित्याचा क्रम म्हणजे बहुधा एकटे एकीकडे भोजनास बसत. एकदा खीर केली होती. खावयाची तितकी खीर समर्थांनीं खाल्ली. पण आणखी पाहिजे, अशी त्यांना वासना झाली. आपणांस अशी वासना व्हावी याचें त्यांना बरें वाटलें नाहीं. वासनेची खोड मोडली पाहिजे असें त्यांच्या मनानें घेतलें. त्यांनीं आणखी खीर मागितली. वेणाबाईनीं वाढली. ती भुरकून 'आणखी वाढा' म्हणालेच, तीही वाढली

आणि भुरकली. तरी 'आणखी वाढा' म्हणालेच. वेणाबाईना थोडे चमत्कारिक वाटलें. कारण असें कधीं मागत नसत. त्यांनीं वाढली, ती संपली तरी यांचें 'आणखी वाढा' सुरूच होतें. शेवटीं खीर ओकून पडली. तरी 'आणखी वाढा' म्हणाले. खीर संपली होती. 'वासने, तुला आणखी खीर हवी ना?' असें म्हणून ओकलेली खीर भुरकून वासनेची खोड मोडण्यास समर्थ तयार झाले. इतक्यांत वेणाबाईनीं त्वरा करून ओकारीवर राख टाकली. वासना जिंकलेल्या असाव्या. न जाणो पुढील अभंग समर्थांनीं याच प्रसंगाला उद्देशून केलेला असेल.

वोकीतां वोकीतां मन कंटाळले । राखेनें झाकीलें सावकाश ।। १ ।।
सावकाश तया कोण अभिलाषी । कोणाला असोसी करायाची ।। २ ।।
कासयाची आतां वासना धरावी । गोडी विवरावी विषयांची ।। ३ ।।
विषयांची गोडी कंटाळलें मन । नागवले जन असोसीचे ।। ४ ।।
आसोसीचे जन ते जन्म घेईल । जीवची देईल विषयांसी ।। ५ ।।
विषयांसी वीट मनापासुनीया । निर्वासना तया जन्म नाहीं ।। ६ ।।
जन्म नाहीं ऐसें केलें देवरायें । वासना उपायें सोडविली ।। ७ ।।
सोडविली देव दयानिधी । तुटली उपाधी सर्व कांहीं ।। ८ ।।
सर्वकांहीं नाहीं हेंचि हें प्रमाण । दासम्हणे खूण देव जाणे ।। ९ ।।
देव जाणें सर्व राहिला विकार । ब्रह्म निर्विकार दास म्हणें ।। १० ।।

अशी आहे ही वासना.

---

ARSA PRODUCTS

ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण होलसेल व रिटेलर्स

# तुझ्या इच्छेप्रमाणें घडूं दे

**जें जें कांहीं घडे सदैव तुझिया इच्छाबळें तें घडे ।**
**ऐसें जाणुनि सोसण्यासि मज तें सद्धैर्य दे तेवढें ॥**

—लेखक : **आप्पाराव**

'आपलें मन प्रसन्न व आनंदी रहावें असें कोणाला वाटत नाहीं ?' परंतु तें घडावें कसें ? प्रसन्नता व आनंद प्राप्त करून घेण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे जें आपल्या आटोक्यांतील नाहीं त्याची चिंता करण्याचें व त्याबद्दल सुखदुःख मानण्याचें आपण सोडून दिलें पाहिजे.' हे एका यूरोपीय तत्वज्ञान्याचे विचार आहेत.

परंतु आपण कोणत्या ना कोणत्या तरी चिंतेंत सदासर्वकाळ गुरफटलेले असतों. उगाच चिंतेचा नसता व्याप आपण आपल्या मागें लावून घेत असतों.

भगवंताची मर्जी जशी असेल तसें होईल. त्याच्यावर सारा भरिभार टाकून आपण निश्चिंत रहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. 'ठेविलें अनंत तैसेंचि रहावें । चित्तीं असों द्यावें समाधान.' ही संतवाणी आपण आपल्या हृत्पटलावर कोरून ठेविली पाहिजे.

× × ×

जी भगवंताची इच्छा तीच आपण आपली इच्छा समजून तिच्यापुढें नेहमीं वाकलें पाहिजे. तो जें इच्छिल तेंच घडेल, असें बाबांनी सांगितलें आहे. तुमचें भवितव्य त्याच्या हातीं आहे. तुमच्या हातीं कांहीं नाहीं, मग शोक किंवा दुःख कां म्हणून करायचें ? तसेंच तो जें कांहीं करतो तें तुमच्या भल्यासाठीं अशी श्रद्धा तुमच्या ठायीं दृढ कां होऊं नये ?

**'ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें'** हें म्हणणें फार सोपें आहे; परंतु तितकेंच तें आचरणांत आणणें कठीण आहे. ज्यानीं हा महामंत्र आचरणांत आणण्यांत यश मिळविलें ते खरोखर धन्य होत.

× × ×

आमचे एक मित्र आहेत. बरी वाईट कोणतीहि गोष्ट असो, 'देव करतो तें आपल्या भल्यासाठीं' हें पालुपद नेहमीं त्यांच्या तोंडी असतें. त्याप्रमाणें थोडेंफार आचरणहि त्यांच्याकडून घडत असतें. त्या मंत्राची घट्ट कांस धरल्यामुळें त्यांच्या चेहऱ्यावर दुःखाची छटा सहसा आढळून येत नाहीं. सुखाचा मूळ मंत्र त्यांना सांपडला आहे.

आम्हांला वाटत असतें कीं, प्रत्येक गोष्ट आमच्या मर्जीप्रमाणें घडून आली पाहिजे. आपण योजल्याप्रमाणें नाहीं घडून आलें कीं मर्जी खप्पा झाली ! मन दुःखी, कष्टी झालेंच म्हणून समजावें. मनाप्रमाणें घडून आलें म्हणजे आनंद व मनाविरुद्ध कांहीं घडलें म्हणजे दुःख ! असा हा सुखदुःखाचा खेळ अविरत चाललेला असतो.

मनाविरुद्ध कांहीं प्रकार घडला म्हणजे केवढें अकांडतांडव, केवढी आदळ आपट आणि मग देवाच्या नांवानें आपण खडे फोडूं लागतो ! त्याऐवजीं

**"जें जें कांहीं घडे सदैव तुझिया इच्छाबळें तें घडे।**
**ऐसें जाणुनि सोसण्यासि मज तें सद्धैर्य दे तेवढें ॥"**

अशी समजूत करून आपण देवाला वरीलप्रमाणें कां बरें आळवीत नाहीं? त्यामुळें काय होईल? दुखाचें व चिंतेचें मूळच उपटून टाकण्यास आपण समर्थ होऊं.

× × ×

कोणतीही परिस्थिति वांट्यास येवो. येईल त्या परिस्थितींत जो आनंदी राहील व 'तुझी इच्छा, !' असें म्हणून जो उत्साहपूर्वक कार्यास लागेल तोच खरा वीरपुरुष होय. या जगांत त्याच्याकडून पराक्रमाच्या गोष्टी घडून येण्याची शक्यता आहे.

सुखाच्या घरांत रहायला मिळो वा वनवास घडो. बरोबर कोणी सहकारी असो वा नसो; थंडीच्यावेळीं फाटकी घोंगडी ओढायला मिळो किंवा मौल्यवान शाल वाट्यास येवो, ज्याच्या समाधानाला जरासुद्धां गालबोट लागत नाहीं, त्यानें आपलें जीवन सफल केलें, असें म्हणायला हरकत नाहीं.

झोपायला जमीन मिळो, खाट मिळो, वा पलंग मिळो; खायला वेळेवर जें मिळेल त्यांत आनंद. जें मिळेल, जेवढें मिळेल व जेथें मिळेल तेथें त्याचा आनंदानें स्वीकार करून पुढील वाटचाल करावयाची. प्रत्येक गोष्टींत कुत्सितपणानें घाण शोधीत न बसतां चांगलें दिसेल तेंच पहावयाचें व तेंच निवडावयाचें. कोणतेंही कार्य करीत असतां तें मनापासून करावयाचें. मग त्यांत यश मिळो वा अपयश मिळो; त्याची खंत बाळगायची नाहीं. तेवढ्यासाठीं प्रसन्नता गमावून बसायचें नाहीं.

× × ×

एक होता राजा; त्याच्या पदरीं एक साधुवृत्तीचा मंत्री होता. कोणत्याही परिस्थितींत आनंदी व समाधानी रहावयाचें हा योग त्यानें साधलेला होता. तो खरोखर भाग्यवान् होता. 'देव जें जें कांहीं करतो तें आमच्या भल्यासाठीं' हें त्याचें नेहमीचें पालुपद होतें. बरें, वाईट कांहीं घडो; देव करतो तें भल्यासाठीं, हा त्याचा तोडगा प्रत्येक प्रसंगीं ठरलेला !

एके दिवशीं जें घडूं नये तें घडलें. राजाच्या आंगठ्याचा कांहीं भाग अपघातामुळें कापला गेला ! केवढी ही दुर्घटना !

मंत्री विश्वासांतला. राजानें तो कापलेला अंगठा त्या मंत्र्याला दाखविला. त्यानें राजाच्या समाधानाकरतां निदान 'अरेरे ! फार वाईट झालें ! औषधोपचार करूं या.' अशासारखे समाधानाचे कांहींतरी दोन शब्द बोलायचे कीं नाहींत? मग मंत्री काय म्हणाला? तो आपल्या नेहमींच्या भाषेंत म्हणाला, 'देव जे जें कांहीं करतो तें आमच्या भल्यासाठींच !'

तें ऐकून राजा क्रोधायमान् झाला ! आणि कोणाला नाहीं येणार राग ! राजाचा राग बरोबर होता.

आधींच बोट कापल्यामुळें राजाला वेदना होत होत्या. त्यांत मंत्र्याच्या वाक्यानें त्याच्या देहाचा अधीकच भडका उडाला ! 'काय म्हणे, देव करतो तें सारें आमच्या भल्यासाठीं ! यांत कसला आलाय भलेपणा ! माझें सर्वांग त्यामुळें ठणकतें आहे. माझा हात निकामी झालाय. आणि त्यांत आहे म्हणे भलेपणा !'

रागाच्या भरांत राजानें हुकूम सोडला कीं तोंडास येईल तें बडबडणाऱ्या या मंत्र्यास कारागृहांत डांबून ठेवा !

राजाज्ञा ! ती ताबडतोब अंमलांत आली. मंत्री महाशय तुरुंगांत जाऊन बसले ! त्यांतही त्यानीं समाधान मानिलें. जातां जातां 'देव करतो तें आपल्या भल्यासाठीं' असें पुटपुटत त्यानें तुरुंगांत प्रवेश केला.

× × ×

राजाला शिकारीचा नाद होता. अंगठ्याची जखम बरी झाली नव्हती तशाच स्थितींत एके दिवशीं राजा जंगलांत शिकारीसाठीं गेला. बरोबरचे लोक मागें राहिले होते. राजा बंदुकीसह पुढें पुढें जात होता. इतक्यांत तो रस्ता चुकला व फिरतां फिरतां थकून गेला. इतका थकला कीं, त्याच्यानें घोड्यावर बसला असतांही पुढें जाववेना. घोड्याला एका झाडाच्या बुंध्याला बांधून राजा झाडाच्या सावलींत स्वस्थ पडून राहिला. इतक्यांत भुकेलेला एक सिंह वास काढीत काढीत तेथें आला. अगदीं नजीक आला. राजा जागच्या जागीं गारठून गेला. सिंह त्याच्यावर झडप घालणार तोंच तुटलेल्या आंगठ्याकडे त्याचें लक्ष गेलें ! नाराज होऊन पुढें टाकलेला पंजा त्यानें तात्काळ मागें घेतला. जखमी झालेल्या प्राण्याच्या वाट्यास सिंह सहसा जात नाहीं. राजा बचावला ! सिंहानें घोड्यावर झडप घालून आपली क्षुधा शांत केली. तो तेथून चालता झाला.

राजाच्या प्राणावर गदा आली होती, परंतु सुदैवानें तो बचावला. कापलेल्या आंगठ्यानें त्याला वांचविलें. राजा राजधानींत आला. राजवाड्यांत दाखल होतांच त्यानें एका नोकरास पाठवून कारागृहवासांत असेलल्या मंत्र्यास प्रथम बोलावून घेतलें. मंत्री महाशय येतांच त्याला उद्देशून राजा म्हणाला, 'मला मान्य आहे तुमचें म्हणणें. देवानें मला चांगला धडा शिकविला. खरं आहे तुमचं म्हणणं ! देव जें कांहीं करतो तें आमच्या भल्यासाठीं ! माझा हा आंगठा कापला गेला नसता तर आज माझ्या प्राणावरच बेतली असती ! सिंहानें फाडफाडून माझे तुकडे करून टाकिलें असते ! परंतु दुसऱ्या एका गोष्टीचा मला अजून खुलासा झाला नाही. सांगा पाहूं, तुम्हांला तुरुंगांत डांबून ठेऊन देवानें तुमचें काय भलें केलें ?'

'महाराज ! काय सांगूं ? देव परम दयाळू आहे. त्याला प्रत्येकाची काळजी आहे. त्याला तुमची काळजी तशीच माझीहि काळजी ! मी तुरुंगांत जाऊन पडलों नसतों तर

आपण शिकारीस जातांना मला बरोबर नेल्याशिवाय राहिला नसतां आणि मला तर कुठेंहि जखम झालेली नव्हती; त्यामुळें तुम्हांला सोडून सिंहानें माझाच फन्ना उडविला असता नाहीं का? तेव्हां मी तुरुंगांत जाणें हें माझ्या कल्याणाचें होतें. देवाचे हेतु अगम्य असतात. त्यांतील रहस्य कधीं कधीं तुम्हां आम्हांला समजत नाहीं; परंतु आपण नेहमीं श्रद्धा ठेविली पाहिजे कीं, तो जें जें कांहीं करतो, तें आमच्या कल्याणासाठीं करतो. तेव्हां भगवंताची इच्छा होती तसें घडलें, असें समजून आपण तिच्यापुढें समाधानपूर्वक मान वांकविली पाहिजे आणि म्हटलें पाहिजे कीं, 'भगवन्, तुझी इच्छा होती तसें घडलें. मी राजी आहे. नेहमीं तुझ्याच इच्छेप्रमाणें घडो.' ( Let Thy will be done )

## बाबांचें भक्त-प्रेम

( चाल : उघडि नयन देवा, क्षणभर – राग : सोहोनी – ताल : त्रिताल )

देवसदनिं येशी ड्हाणुला ॥ ध्रु० ॥

भक्ता काजा वेष यतीचा ।
थोरपणा परि लक्ष्मी सतीचा ।
उद्यापनदिनीं दो शिष्यांसह ।
येउनि भोजन घेशी ॥ १ ॥

मान देउनि निमंत्रणाला ।
श्याम बापु हें सांगति तुजला ।
येउं तिथे अम्हि लिहि लिखिताला ।
सार्थ वचन करिसी ॥ २ ॥

नेउनि बुध्द्य आडपथाला ।
स्वयें रचयिसी लीला-माला ।
भोजन करुनि स्मृती देउनी ।
भूलि मना पाडिसी ॥ ३ ॥

गुरुछाया
ठाणें

— जानकीतनय

# रामभक्तीचा महिमा

*********************

महाराष्ट्राप्रमाणें आंध्र प्रांतांतही एका रामदासांचा उदय झाला. परंतु त्या भगवद्भक्त रामदासाची तुलना थोडीफार संत दामाजी यांच्याशीं करतां येईल. देव प्रिय भक्ताचें संकट दूर करण्यासाठीं कसा असेल तसा धावून येत असतो.

आपल्या प्रिय भक्तासाठीं देव काय करील आणि काय करणार नाहीं हें सांगतां येणें कठीण आहे. भगवद्भक्त काय महाराष्ट्रांत तेवढे आहेत आणि इतरत्र नाहींत असें थोडेंच आहे? आपल्या महाराष्ट्रांत बादशहाच्या नोकरींत असलेल्या संत दामाजीच्या हांकेला ओ देऊन पंढरीराय महार बनले, त्याचप्रमाणें आंध्र प्रांतांत संत रामदास या नांवानें ख्यातनाम असलेल्या सत्पुरुषाचा अवतार झाला. त्यांच्या जीवनांतहि दामाजीसारखाच एक प्रसंग घडून आला आणि त्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें.

## दक्षिणेकडील अयोध्या

गोदावरीच्या कांठीं भद्राचलम् या नांवाचें एक पवित्र क्षेत्र आहे. भद्राचलम्ला दक्षिणेकडील अयोध्या असेंहि म्हणतात. एवढें त्या स्थानाचें महत्व व महात्म्य आहे. वनवासांत असतां श्रीरामचंद्र या ठिकाणीं कांहीं काळ राहिले होते असें सांगतात. येथें एक सुंदर व फार मोठें राममंदिर आहे. तें इतिहासप्रसिद्ध आहे. तेथें श्रीरामचंद्र, सीतादेवी व लक्ष्मण यांच्या भव्य मूर्ति आहेत. भक्त रामदासाच्या हस्तें या भव्य मंदिराची स्थापना झाली. त्या मंदिरामागें अति रम्य इतिहास आहे.

या रामदासांचें पाळण्यांतील नांव होतें गोपन्न. एका गरीब ब्राह्मण कुळांत त्याचा जन्म झाला. गुजरातमध्यें नागर ब्राह्मण त्याचप्रमाणें आंध्रमध्यें नियोगी ब्राह्मण या नांवानें ओळखले जाणारे ब्राह्मण फार विद्वान् व त्यागी समजले जातात. विद्वत्ता ही त्यांना ईश्वरी देणगीच आहे व ती वंशपरंपरेनें चालू असते.

अशा ब्राह्मण कुळांत जन्मलेला गोपन्न. बाळपणापासून त्याची हुषारी दिसून येऊं लागली. बालपणापासून त्याचें रामावर प्रेम. ध्यानींमनीं राम. देवी सरस्वतीहि त्याच्यावर प्रसन्न होती. देवभक्ति व विद्वत्ता हीं एकत्र झालीं होतीं.

'विद्वान् सर्वत्र पूज्यते.' त्याच्या विद्वत्तेचा घरीं दारीं व बाहेर आस्ते आस्ते प्रकाश पडूं लागला. बादशहाच्या दरबारापर्यंत तो कीर्ति सुगंध जाऊन पसरला. त्याकाळीं दक्षिणेच्या गादीवर नबाब तानाशहा हे विराजमान झालेले होते. गोपन्नाची लायकी ध्यानीं आणून बादशहानें भद्राचलम्ची तहशीलदारी त्याला दिली. त्याची सचोटी

वाखाणण्याजोगी होती. महसूल जमा करायचा व तो बादशाही खजिन्यांत जमा करावयाचा. गोपन्नच्या कारकिर्दीवर त्या भागांतील सारी प्रजा निहायत खूष होती. गोपन्न देव माणूस होता. कोणाला त्रास द्यायचा नाहीं, कोणाला तोडायचें नाहीं. सर्वांना सांभाळून घ्यायचें हें त्याचें नेहमीचें धोरण; त्यामुळें प्रजाहि त्याला दुःखांत लोटीत नसे; संकटांत घालीत नसे.

वार्षिक वसूल अकरा लक्ष सुवर्ण मोहरांचा होत असे. त्याप्रमाणें तो हातीं आला व स्थानिक खजिन्यांत तो भरण्यांत आला. स्थानिक खजिना तहशीलदार गोपन्न यांच्या स्वाधीन. बादशाही खजिन्यांत त्याचा सवडीनुसार भरणा व्हावयाचा.

**जीवनांत क्रांति**

एके दिवशीं रात्रीं गोपन्नाच्या स्वप्नांत दाशरथी राम, सीता व लक्ष्मण ही त्रिमूर्ती आली. तो आनंदानें बेहोष झाला. सर्वांग रोमांचित झालें. त्या नयनरम्य मूर्ती त्याला जिकडेतिकडे दिसूं लागल्या. सारें राममय झालें. सकाळीं उठतांच गोपान्नला एक भव्य राममंदिर बांधण्याची प्रेरणा झाली.

राममंदिर बांधणें ही साधीसुधी का गोष्ट आहे? लक्षावधि रुपये जवळ असावें त्यानेंच पाऊल बाहेर टाकावें; परंतु गोपन्न आतां पूर्वीचा राहिला नव्हता. त्याला श्रीरामाचें दर्शन घडलें होतें. तो पुण्यपावन झालेला होता. त्याला काय उणें भासणार? 'भक्ताला काय उणें रे!' खजिन्यांत अकरा लक्ष मोहरा जमा झालेल्या होत्या. त्या कोणाच्या? त्या प्रभू रामचंद्राच्या! हें जें सारें आहे तें कोणाचें? प्रभु रामचन्द्राचें! आपण काय, बादशहा काय आणि कोण काय! सारे रामचंद्राचे सेवक आहोंत. जें कांहीं आहे तें सारें त्याचें! अशी आतां त्याची वृत्ति झाली होती. राममंदिर बांधायचें तर त्यासाठीं चिंता कां म्हणून करायची? राम पाहून घेईल. आपण सत्कार्यासाठीं धन नाहीं खर्च करायचें तर काय त्याचा उपयोग? बस्स, खजिन्यांतील पैशाच्या बळावर आपण एक भव्य व टुमदार राममंदिर उभरावयाचें असा निर्धार करून काम सुरू करण्यांत आलें.

उत्तमोत्तम कारागीर व कामगार रोजच्या रोज त्यासाठीं झटून काम करूं लागले. रोजच्या रोज त्यांना मजुरी मिळूं लागली. खजिन्यांतील पैसा मंदिरासाठीं खर्ची पडूं लागला. दिवसेंदिवस मंदिर वर येऊं लागलें. गोपन्न सर्वस्वी त्याच कामगिरीवर होता. रात्रंदिवस बांधणीचें काम सुरू होतें. कधीं एकदां राम सीता व लक्ष्मण यांना मंदिरांत डोळे भरून पाहीन असें गोपन्नाला झालें होतें. तो तहानभूक, झोप, विश्रांति सारें सारें विसरला होता.

या मंदिरासाठीं आपण बादशाही खजिना खर्चीत आहोंत; त्याचा आपल्यावर ठपका येईल. एक दिवस जाब द्यावा लागेल, यासंबंधीं त्याला बिलकूल काळजी वाटत नव्हती. श्रीरामचंद्र दर्शनामुळें तो निर्भय झालेला होता. बादशहा आपल्याला ताडण करील शी पुसट कल्पनाहि त्याच्या मनाला शिवली नाहीं!

गोपन्न राममय झालेला होता; परंतु बादशहा होता तसाच होता. त्याच्या सभोंवारची माणसेंहि तशींच्या तशीं होतीं. बदलला होता काय तो गोपन्न !

राममंदिराचें काम पूर्ण झालें. श्रीरामचंद्र, सीतादेवी व लक्ष्मणजी यांच्या सुंदर मूर्तींची त्या मंदिरांत समारंभपूर्वक प्रतिष्ठापना झाली. गोपन्नाचें स्वप्न साकार झालें. त्याची मनकामना परिपूर्ण झाली. आपण कृतकृत्य झालों. जन्मा आलियाचें सार्थक झालें, असें अभूतपूर्व समाधान त्याला वाटूं लागलें. ध्यानमग्न स्थितींत तो राममूर्तीसमोर अहोरात्र बसून राहूं लागला.

**अटकेचा हुकूम**

भद्राचलम्‌मध्यें भव्य समारंभ झाल्याची वार्ता बादशहाच्या कानीं गेली. खजिन्यांतील सारा पैसा खर्च करून राम मंदीर बांधलें गेलें, हीहि वार्ता बादशहापर्यंत पोहोंचली.

अकरा लक्ष सुवर्ण मोहरांचा हा गहन प्रश्न होता. गोपन्नावर बादशहाचा भारी विश्वास. परंतु आतां विश्वासघात झालेला होता. गोपन्नाकडून गुन्हा घडलेला होता. नबाबानें गोपन्नास पकडून आणण्यासाठीं सैन्य पाठविलें. सैन्य भद्राचलम्‌मध्यें येऊन पोहोंचलें. तेव्हां गोपन्ना होता राममंदिरांत. सैन्यानें राममंदिरास वेढा दिला व गोपन्न ध्यानमग्न स्थितींत असतां त्याला अचानक अटक करण्यांत आली.

गोपन्नास बादशहापुढें हजर करण्यांत आलें. बादशहानें विचारलें, 'अरे बाबा ! तूं खजिन्यांतील सारा पैसा राममंदिरासाठीं खर्च केलास, तो कोणाच्या परवानगीनें ?'

'परवानगी कोणाची घ्यायची ? सर्वांचा अधिपति, राजाधिराज श्रीरामचंद्र याची तर सारी संपत्ति. त्याच्याच प्रेरणेनें ती मी त्याच्या कार्यासाठीं खर्च केली ! त्यांत परवानगी घेण्याचा प्रश्नच कुठें उद्भवतो ? मी स्वतःसाठीं एकही मोहोर खर्च केली नाहीं. साऱ्या मोहोरा श्रीरामाच्या सेवेसाठीं खर्च केल्या आहेत !'

गोपन्नाच्या या उत्तरानें बादशहा चिडला नाहीं. तो सुस्वभावी होता. गोपन्नावर त्याचें प्रेम होतें. साऱ्या तहशीलदारांत त्याचा क्रमांक पहिला होता; परंतु यावेळीं त्याला काय बुद्धि झाली, डोकें फिरलें आणि त्यानें सारा पैसा राममंदिरासाठीं खर्च केला !

अशी स्वतःची समजूत करून घेऊन त्यानें गोपन्नास कारागृहांत नेऊन ठेवण्याची आज्ञा दिली.

गोपान्नाचा आतां कारागृहवास सुरू झाला. त्यामुळें तो दुःखीकष्टी झाला नाहीं. त्याला राजवाडा आणि कारागृह दोन्हीं सारखींच होतीं. 'जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती !' अशी ज्याची वृत्ति झालेली त्याला कुठेंही ठेवा. आनंदाची आणि त्याची फारकत व्हायची नाहीं. भद्राचलम्‌मधील श्रीराममंदिरापासून आपण दुरावलों, या गोष्टीचें मात्र त्याला दुःख वाटूं लागलें.

## कारागृहांतील कामगिरी

परंतु कारागृहांतील काळोख्या वास्तव्यांत त्यानें छोटेसें राममंदिर उभें केलें; तेथेंही त्याची रामभक्ति सुरू झाली. तो बादशहावर रागावला नाहीं. त्या कारागृहवासांत त्याला काव्यस्फूर्ति झाली व त्या स्फूर्तीमधून 'श्रीदाशरथी शतक' या महा काव्याचा जन्म झाला. आंध्र प्रांतांत आजहि तें काव्य सर्वतोमुखी होऊन राहिलें आहे.

या काव्यासंबंधानें एक कथा त्या भागांत प्रचलित आहे. तें काव्य लिहून पूर्ण झालें. त्यानें तें डोळे भरून पाहिलें; परंतु त्याचा लोभ बाळगला नाहीं. कारागृहाला लागून गोदावरीचा जलप्रवाह झुळुझुळू वहात होता. ती काव्याची पोथी रुमालांत गुंडाळून गोपान्नानें खिडकीवाटे जलप्रवाहांत टाकिली. काव्य जीव तोडून लिहिलें आणि ते गंगार्पण करून गोपन्न मोकळे झाले !

ती चांदणी रात्र होती. कोणी एक नावाडी आपल्या नौकेंतून त्या जलप्रवाहांतून मार्ग काढीत चालला होता. त्याच्या नजरेस ती तरंगणारी पोथी पडली. त्यानें मोठ्या कुतुहलानें ती उचलून घेतली व योग्य माणसाच्या हातीं दिली.

गोपन्नाचें काव्यलेखन संपलें होतें; एके दिवशीं रात्रीं बादशहा नेहमींप्रमाणें आपल्या राजमंदिरांत सुखनिद्रा घेत होता. मध्यरात्रींचा समय झालेला होता. इतक्यांत दोघे तेजस्वी तरुण त्याच्यापुढें येऊन उभे राहिले. त्यांनीं बादशहास हालवून जागा केलें व सलाम करून घाबरूं नका म्हणून आश्वासिलें.

बादशहा आश्चर्यचकित मुद्रेनें त्यांच्याकडे पाहूं लागला. त्याला बोलायचें सुचेना. त्यांपैकीं एकजण म्हणाला, 'माझें नांव रामन्ना व याचें नांव लच्छन्ना. आम्ही दोघेही गोपन्नाचे सेवक आहोंत. त्यांनीं खर्च केलेल्या अकरा लक्ष सुवर्ण मोहोरा देण्यासाठीं आम्ही आलों आहोंत. या घ्या आणि त्याला बंधमुक्त करा. आम्हीं चाललों!'

## बादशहाचें लक्ष सुवर्णाकडे

बादशहा त्या चकाकणाऱ्या सुवर्ण मोहोरांकडे टक लावून पहात होता. तो गोंधळून गेला होता. ती वेळ, तो प्रसंग व तो सुवर्ण मोहोरांचा ढिगारा कोणालाही बुचकळ्यांत पाडणारा होता. मग बादशहा दिङ्मूढ झाला असल्यास नवल कसलें ?

परंतु त्या तेजस्वी तरुणांच्या दर्शनानें बादशहा मनांतल्या मनांत विरघळला ! गोपन्नावर ईश्वराची कृपा आहे हें तो उमगला. नाहीं पेक्षां कुठून आणणार तो अकरा लक्ष मोहोरा ! ही देवकृपा आणि ते देवदूतच होते याची जाणीव बादशहास झाली.

परंतु ते देवदूत नव्हते. ते प्रत्यक्ष रामलक्ष्मणच होते ! आणि भक्तकाजासाठीं त्यांनीं एवढे परिश्रम घेतले होते !

सकाळीं उजाडतांच बादशहा कारागृहांत गोपन्नाची भेट घेण्यासाठीं बाहेर पडला. त्याच्या खोलीचा दरवाजा उघडून पहातां तो राम भजनांत तल्लीन झालेला बादशहाला आढळून आला. बोलाफुलास गांठ पडली. बादशहाला पश्चात्ताप झालेला होता.

गोपन्ना त्याला प्रत्यक्ष परमेश्वर भासला, त्यानें त्याला साष्टांग प्रणिपात केला व त्याच्या-जवळ क्षमा मागितली व म्हणाला, 'धन्य आहे गोपन्ना तुझी! केवढा तुझा अधिकार! प्रत्यक्ष परमेश्वर रात्र अपरात्र न पहातां तुझ्यासाठीं तुझा नोकर होऊन भटकतो हें किती आगळें भाग्य आहे तुझें!'

'नाहीं महाराज! भाग्यवान् आपण अहांत. प्रत्यक्ष भगवंताचें आपणास दर्शन घडलें! आणि तें प्रत्यक्ष दर्शन माझ्या वाट्यास मात्र अजून आलेलें नाहीं!

'तसं कसं होईल? आपण सच्चे रामदास अहांत. रामाला आपण आपला दास बनविलें! मी मात्र अभागी! माझ्या सन्निध भगवंत आले असतां मी टक लावून पहात होतों सुवर्ण मोहोरांकडे! माझ्यासमोर येऊनहि मी त्यांना डोळे भरून पाहूं शकलों नाहीं!'

'कांहीं चिंता नाहीं! रामप्रभू सर्वत्र आहेत. भक्तिभाव ठेवा. जेथें पहाल तेथें तुम्हांला रामप्रभूच दिसतील! मोहरांच्या म्हणजेच मोहाच्या तावडींतून सुटका करून घ्या म्हणजे झालें!' गोपन्ना म्हणाला.

गोपन्नांची कारावासांतून सन्मानपूर्वक मुक्तता झाली. त्यांच्यासह नबाबसाहेब भद्राचलम्‌ला आले व त्यांनीं भक्तिभावपूर्वक श्रीरामचंद्रप्रभूंचें दर्शन घेतलें. त्यांनीं त्या मंदिराला वर्षासन करून दिलें व गोपन्न यांच्याकडे सर्व कारभार सोपविला. त्या दिवसा-पासून गोपन्न यांस सारी जनता 'रामदास' या नांवानें ओळखूं लागली व संबोधूं लागली. त्यांनीं यानंतरचें आपलें सारें जीवन रामसेवेंत घालविलें व जनसेवा करतां करतां ते निजधामास गेले.

---

रोज म्हटली जाणारी वस्तु यांत्रिक झाली तर ती चित्तांत ठसण्याऐवजीं पुसली जावयाची; पण हा नित्यपाठाचा दोष नसून मनन नसल्याचा दोष आहे. नित्यपाठा-बरोबर नित्य मनन व नित्य आत्मपरिक्षण आवश्यक आहे.

—संत विनोबा


॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

**महिला वस्तु भांडार**

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें

लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

*** आमचीं कोठेंही शाखा नाहीं. ***

# मनाची शांति कशी मिळवाल ?

मनाच्या शांततेवर आपलें सुख अवलंबून आहे; परंतु तीच आव-श्यक गोष्ट आपल्यापासून दूर झालेली आहे. ती आपण कशी मिळवणार ?

आजकाल जगांत नाना प्रकारचीं सुख संपादन करण्याचीं साधनें उपलब्ध झालीं आहेत. स्फूर्ति देणारीं साधनें आहेत; परंतु आपल्या शरिरांत वास करणाऱ्या मनाला जर शांति नसेल तर बाह्य सुखाचा काय उपयोग ? मनाची शांति ही कांहीं और चीज आहे. ती ज्यानें मिळविली त्यानें सर्व कांही मिळविलें; परंतु ती मिळविणेंच महा कठीण काम आहे. सभोंवार कोलाहल चालू आहे. मनावर आघात, प्रत्याघात होणारे प्रसंग प्रत्यहीं घडत आहेत; आणि ते घडत असतांहि जो आपलें मन शांत ठेऊं शकतो तो स्थितप्रज्ञ व खरा सुखी होय. एकदां का मनाच्या शांतीची गुरुकिल्ली तुमच्या हातीं लागली म्हणजे राग, द्वेष, बेचैनी, चिंता, दुःख, खेद यांची बाधा तुम्हांला होऊं शकणार नाहीं. हे जे दोष आहेत त्यांपैकीं एखादा जरी आपल्या वाट्यास आला तरी आपली शांतता भंग पावूं शकते. आणि त्यामुळें शरिरावर विपरीत परिणाम होऊन अन्नद्वेष, अपचन वगैरे शरीरहानी करणारे नाना प्रकार निर्माण होतात आणि त्यामुळें तुम्ही अस्वस्थ बनतां. ज्याला नाहीं स्वस्थता त्याचें कसलें आलें आहे जीवन ! तें जिवंतपणींचें मरण होय.

## शरीर यंत्राची रचना

अंतःकरणांतील शांततेचें महत्व फार मोठें आहे. आपलें शरीर हें एक महान् यंत्र आहे. त्या यंत्रांत बिघाड केव्हां होतो ? जेव्हां मन शांत नसतें तेव्हां. मनाची शांतता कोणत्याहि कारणानें असो, एकदां का बिघडली म्हणजे शरीरयंत्र भडकलें म्हणून समजावें. शरिराला उत्साहाचें व कर्तृत्वाचें इंधन पुरविलें जात असतें मनाकडून.

आपणास शीतल वारा देणारें पंख्याचें यंत्र घ्या. त्यांत कांहींतरी अडकलें म्हणजे शीतल वारा देण्याची त्याची क्रिया थबकली म्हणून समजावें. तसेंच आहे या शरीर यंत्राचें. शांततेच्या स्वच्छ रुळावर जोंपर्यंत गाडा आहे, तोंपर्यंतच तो नीट व सरळ चालावयाचा. भय, चिंता हे विकार मनाला जडले तर कार्याला खीळ पडलीच म्हणून समजावें. भीति फार वाईट. मग ती कोणत्याहि स्वरूपाची असो. मनावर भीतीचा पगडा बसला म्हणजे मग तुमचें पाऊल पुढें कसें पडणार ? चिंता हाही तसाच एक दुर्धर रोग आहे. तो शरिराला पोखरून टाकतो. रागाचेंहि तसेंच आहे. त्या भरांत तुम्हीं सारें विसरून काय वाटेल तें करूं लागतां !

या साऱ्या परिस्थितीवर आपणाला जय मिळवावयाचा आहे. मनाच्या अस्वस्थ व अस्थिर स्थितींत आपण अविचारानें काय वाटेल तें करून मोकळे होतां. मनाची

अस्थिरता ही गोष्ट अत्यंत भयानक आहे. मनुष्य विवेकभ्रष्ट केव्हां होतो ? ज्यावेळीं त्याच्या मनावर ताबा नसतो त्यावेळीं. रागानें, भयानें किंवा चिंतेनें मनावर ताबा मिळविलेला असला म्हणजे सहाजिकच मन निष्क्रिय बनतें.

**मनावर ताबा मिळविण्यासाठीं झटा**

यासाठीं मनावर ताबा मिळविणें, मनावर स्वार होणें अत्यंत जरूर आहे. नाहीं पेक्षां तें कुठें सैरावैरा धांवत सुटेल व कोणत्या प्रकारचे घातपात करील याचा नेम नाहीं. यासाठीं सावधान ! मन आवरा, मनावर ताबा मिळविण्यासाठीं हर प्रयत्नानें झटा. देवाची करुणा भाका. प्रार्थना करा, आणि मनावर ताबा मिळवा.

आपल्या मनाच्या सभोंवार असंख्य कांटेरी व विषारी झाडें झुडपें उगवलेलीं आहेत. त्याचप्रमाणें मधुर सुगंध देणाऱ्या फुलांचेही ताटवे त्याच्या सभोंवार आहेत. कांटेरी व विषारी झुडपें केव्हां उगवतात ? ज्यावेळीं मनांत सैतानी व विषारी विचार उद्भवतात त्याचवेळीं ! आणि मनांत दैवी, उत्तेजक व सुंदर विचारांचें थैमान सुरू झालें म्हणजे मनाच्या सभोंवार कसा निर्मल सुगंध दरवळत असतो !

शहाणा माळी कांटेरी झाडेंझुडपें तोडून टाकून त्या जागीं सुंदर, नयनरम्य व सुगंधीत फुलांचे ताटवे लावतो, त्यांना खतपाणी घालतो, त्यांची मनोभावें मशागत करतो. आणि त्याचें योग्य तें पारितोषीक त्याला योग्यवेळीं मिळाल्याशिवाय रहात नाहीं. तसेंच आहे हें ! असा जो कोणी माळी तोच आपला संसार सुखासमाधानाचा व आनंदाचा करूं शकतो. तोच सारी दुनिया आनंदानें भारून टाकतो !

या जगांत आपणांस एवढी गडबड कोलाहल, अशांतता, अविश्वास, दुःखदैन्य कां बरें आढळून येतें ? कारण आपल्या मनांत त्या दुष्ट प्रेरणांनीं मूळ धरलेलें असतें. द्वेष, अशांतता आपल्या मनांत भरून गेलेली आहे. त्यामुळें आपणांस जिकडे तिकडे अशांतता आढळून येते हेंच त्यांतील रहस्य आहे.

तुमच्या मनांत अशांततेचें वादळ माजलें आहे तें तुम्ही येनकेनप्रकारेण दूर केलें पाहिजे. तुमच्या मनांत सैतानी भावनांचें थैमान सुरू झालें म्हणजे जिकडे तिकडे तुम्हांला सैतान दिसूं लागणार; परंतु मनांत कल्याणप्रद विचारांचे वारे वाहूं द्यात. मग त्याच विचारांनीं तुम्हीं भारले जाल व जगालाहि भारून टाकाल.

## विचार कसे असावे ?

माझें सर्वांशीं प्रेमाचे, बंधुभावाचें नातें आहे. मी सर्वांसाठीं आहें. माझा कोणीहि शत्रु नाहीं. सारे माझे मित्र आहेत. सारेजण माझ्या कल्याणासाठीं झटणारे आहेत व मीहि सर्वांच्या कल्याणासाठीं झटणारा आहें. मी सर्वांना आनंद व सुखसमाधान देणार व इतरहि मला समाधान, सुख व आनंद देणार. माझ्या सभोंवार आंत व बाहेर शांततेचा सुखदायक प्रकाश पसरलेला आहे आणि त्याच प्रकाशांत मी तळपत आहें. अशा प्रकारच्या लाभदायक विचारांचा तुमच्या मनांवर संपूर्णपणें पगडा बसूं द्या, म्हणजे पहा काय अनुभव येतो तो !

आम्ही कोणाशींही प्रेमानें व शांततापूर्वक बोलावें व वागावें. कोणाच्या मनावर आघात होईल, कोणाचें मन दुखावेल, जखमी होईल अशा रीतीनें कधींही वागूं नये, व बोलूं नये. हातीं कोणतेंहि कार्य असूं द्या. तें घाई घाईनें नव्हे, तर शांततापूर्वक पार पाडण्यासाठीं झटावयाचें. त्यामुळें तुम्हीं त्या कार्यांत यशस्वी व्हाल व मनाची शांतता गमावून बसणार नाहीं. अशा रीतीनें मन शांत राहील तर शरीरही शांत राहील व तुमचें आरोग्य सुधारेल. शांति, शांति, शांति, असें त्रिवार म्हणतात तें कशासाठीं ! तुमच्या मनावर शांततेचे संस्कार घडावे व तुम्हीं सुखी व्हावें यासाठींच.

मन हें संस्कारक्षम आहे. सुंदर विचार मनांत घोळवीत राहिलें, प्रभावी व पोषक विचार मनांत वारंवार येत राहिले, दृढ संकल्प आपण करीत राहिलों म्हणजे मन ते खेचून घेतें. मनाला स्वैर न सोडतां शांत राखावयाचेंच अशा निर्धारानें आपण वागूं लागल्यावर कोणाची आहे प्राज्ञा त्याला दुसरीकडे ओढून नेण्याची !

## निर्धारपूर्वक वागा.

जे जे विचार केवळ उत्तेजक परंतु तुम्हांला आड मार्गानें नेणारे आहेत, त्या विचारांस मनांत मुळींच थारा देऊं नका. निर्धारपूर्वक झगडून त्यांची हकालपट्टी करा. त्यांच्या वाऱ्यासहि उभे राहूं नका. घोटभर गार पाणी प्या. थंड, शांत व्हा. थोडी विचारपूर्वक विश्रांति घ्या. कार्यांत जरूर वाटल्यास बदल करा. जागेंत बदल करा— स्थलांतर करा; परंतु दुष्ट विचारांच्या तावडींत किमपि सांपडूं नका.

मनाची शांति बिघडावी, असे प्रसंग या आयुष्यांत हरघडी येतात. मुलेंबाळें सतावतात, त्यांना बोलावें लागतें, मारझोड करावी लागते. घरांतील नोकर नीट कामकाज करीत नाहींत त्यांच्यावर चडफडावें लागतें. बायको, मुलगा किंवा घरांत आणखी कोणी तरी मनाविरुद्ध वागतात. त्यामुळें मनावर आघात होतो. अहो ! असे एक, दोन नव्हे, शेंकडो प्रसंग घडतात; ते तसेच घडत रहाणार. त्यांना अंत ना पार !

परंतु त्यांपैकीं कोणत्याही कारणाचा मी माझ्यावर वरचष्मा करूं देणार नाहीं, त्यांच्या तावडींत मी सांपडणार नाहीं. मी देवाचें नांव घेऊन त्या खाऱ्या गोष्टींकडे, प्रलापांकडे पाठ फिरवून स्वानंदांत डुबून आपल्या सत्कार्यांत निमग्न होऊन रहाणार; अशा निर्धारानें वागणाराच शांतिसुखाचा लाभ घेऊं शकेल. नाहींपेक्षां आयुष्यभर ओढाताण चाललीच आहे.

---

— भगवंताकडे जाण्याचे मार्ग अनेक व भिन्न भिन्न प्रकारचे आहेत; तुम्हीं ज्या मार्गाची निवड कराल त्यालाच कायमचे चिकटून रहा व कितीहि संकटें आलीं तरी सर्व सामर्थ्य त्याच मार्गानें जाण्यासाठीं खर्च करा; परंतु तुम्हीं स्वीकारलेला मार्ग तेवढाच एक भगवंताकडे जाण्याचा सुयोग्य मार्ग आहे, व इतर मार्ग कुचकामी आहेत, असें केव्हांही मानूं नका.

— श्रीरामकृष्ण

# आचारधर्माचें महत्त्व

******************

**—महात्मा गांधी**

प्रभू रामचंद्र वनवासास जायला निघाले तेव्हां दशरथ राजा त्यांस म्हणाला, 'मी कैकयीला दिलं असेल वचन! त्याचें काय मोठेसें! त्याची तूं चिंता करूं नकोस. पुत्रप्रेमामुळें दशरथानें ही तोड सुचविली. परंतु रामचंद्राला ती मानवली नाहीं. त्याला पुत्रकर्तव्याची आठवण झाली. तें कर्तव्य बजावण्यांत जीवनसाफल्य आहे हें त्यानें ओळखलें व वनवासांत जाण्याचा निर्धार करून त्यानें स्वतःचें व त्याचबरोबर दशरथाचें नांव आजकाल अमर करून ठेवलें आहे. हरिश्चंद्र राजानें आपली बायको दुसऱ्यास विकली व पुत्र रोहिताच्या गळ्यावर तरवार चालविण्यापर्यंत तत्परता दर्शविली ती कशासाठीं? त्यांतच त्याची स्त्रीभक्ति, पुत्रप्रेम सामावलेलें आहे, प्रल्हादनें काय केलें? त्याला आपल्या पित्याची अवज्ञा करावी लागली! व तसें करण्यांत त्याची पितृभक्ति होती व त्यायोगें त्यानें स्वतःचा व पित्याचाहि उद्धार केला. मिराबाईनें वेळ आली तेव्हां कुंभराण्याचा त्याग करण्यांस मागेंपुढें पाहिलें नाहीं व शेवटीं त्याला आपला भक्त बनविला. दयानंद सरस्वतीनें आपल्या आईवडिलांचा त्याग केला, ठरलेलें लग्न मोडून टाकिलें व आपल्या मागें लागलेल्या माणसांच्या हातून सुटका करून घेतली व खऱ्या मातृभक्तीचा व पितृभक्तीचा झेंडा फडकविला. बुद्धदेवानें काय केलें? तरुण पत्नी निद्रावश झालेली असतां तिचा त्याग करून तो घराबाहेर पडला व सर्वांच्या उद्धारास कारण झाला.

अशीं किती उदाहरणें सांगूं? आपण त्यांचा मननपूर्वक विचार केला पाहिजे. आयुष्यांत अंतीम निर्णय घेण्याचा प्रसंग केव्हां ना केव्हां येत असतो. मोठा संकटाचा प्रसंग असतो तो! त्यावेळीं दूरवर विचार करून सद्सद्विवेक बुद्धीला जागी करून जो निर्णय परिणामी हितकर वाटेल तोच घेण्यांत जीवनसाफल्य आहे. जो सत्याच्या मार्गानें जाण्यासाठीं सतत धडपडत असतो, त्याला कधीं कधीं अगदीं ऐन प्रसंगीं खरा मार्ग कोणता याची सूचना मिळते.

वैराग्यासंबंधीं व इतर धर्म व कर्तव्यासंबंधीं आपण पदें व विचार वाचतों; परंतु आपल्यावर धर्मसंकट आलें असतां काय करायचें व काय टाळायचें यासंबंधीं त्या वाचनाचा उपयोग झाला नाहीं तर त्या वाचनाचा व पाठांतराचा काय बरें उपयोग? ती पोपटपंचीच म्हणावी लागेल. गीतेचें वाचन पठण पुष्कळ केलें, परंतु रोजच्या व्यवहारांत व आणी-बाणीच्या प्रसंगी तिचा उपयोग करतां आला नाहीं तर त्याचा काय बरें उपयोग? यासाठीं मी नेहमीं सांगत आलों आहे कीं, थोडें वाचा, परंतु त्याचें रहस्य विचारपूर्वक समजून घेऊन तें पचविण्यास व आचरणांत आणण्यास शिका.

# राजा आणि यमदूत

**यमदूत** : महाराज! यमराजांनीं तुमच्या राज्यांतून कोणीतरी एक प्राणी मागितला आहे.

**राजा** : असें का? मग चल मलाच घेऊन. माझी तयारी आहे येण्याची !

**यमदूत** : तुम्हींच स्वतः येणार !: तुम्हीं येऊन कसं बरं चालेल? तुमच्या राज्यांत थोडीं थोडकीं का माणसें आहेत? त्यांपैकीं कोणातरी एकाला माझ्या स्वाधीन करा म्हणजे झालें!

**राजा** : अशी का तुझी सूचना आहे! अरे! माझ्या राज्यांतील सर्व प्राणी-मात्रांच्या रक्षणाची जबाबदारी माझ्यावर आहे. असें असतां मी मागें राहून कोणाला बळी देण्यासाठीं पुढें करूं सांग पाहूं?

**देवदूत** : महाराज! धर्मराजानें तुमच्या राज्यांतील सर्व लोकांना स्वर्गांत येण्याचें आमंत्रण दिलें आहे; परंतु भावी काळासाठीं फक्त एका कोणास तरी मागें रहाण्यास त्यांनीं आज्ञापिलें आहे.

**राजा** : ठीक आहे. मग जा साऱ्या लोकांना स्वर्गांत घेऊन. मीच तेवढा मागें राहातों?

**देवदूत** : काय म्हणतां, तुम्हीं स्वतःच मागें रहाणार! तुमच्या राज्यांतील असंख्य प्राण्यांपैकीं ठेवा कोणातरी एखाद्यास मागें! स्वर्गाला जाण्याची चालून आलेली ही संधि तुम्हीं कां म्हणून वायां दवडतां? हा का शहाणपणा झाला?

**राजा** : अरे बाबा! तुझा तो शहाणपणाचा मार्ग राहू दे तुझ्याजवळ. माझ्या राज्यांतील सर्व प्राण्यांच्या कल्याणाची जबाबदारी माझ्या शिरावर आहे. मी माझें कल्याण साधण्यासाठीं दुसऱ्या एखाद्याच्या कल्याणाआड यावें असें नाहीं मला वाटत! माझ्याकडून तें कालत्रयीं घडणारें नाहीं!'

× × ×

---

एका हरिजनास कोणी एक गृहस्थ म्हणाला, 'काय रे! तुला भगवंताचें दर्शन घडावें असें नाहीं कां वाटत?'

यावर तो हरिजन म्हणाला, 'ज्याला भगवंताच्या मूर्तीचे दर्शन घडल्यामुळें किंवा तिला स्पर्श केल्यामुळें समाधान वाटतें, त्यांना त्या मार्गानें खुशाल समाधान मिळवूं द्या. परंतु दूर राहून व देवालयाचें शिखर डोळे भरून पाहून जर माझें समाधान होत असेल तर तें मी कां मिळवूं नये?'

श्रीकृष्ण जन्माचे वेळेस प्रेम आणि भक्ति यांना जणूं काय ऊतच आला होता. त्या वेळचीं माणसें महान उद्योगी असून एकमेकांवर आत्यंतिक प्रेम करीत होतीं. मुलगा आईबापावर, भाऊ बहीणीवर, नवरा बायकोवर व सर्वही परस्परांवर अनुरक्त असून फार सुखानें नांदत होतीं. पाहुणचार, वृद्धाविषयीं आदर हे गुण तर फारच वाढीस आले होते. साधुसन्त व परमेश्वर याबद्दल लोकांच्या मनांत नितांत आदर नांदत होता. व भक्तिमार्ग कळसाला पोहोंचला होता. मनाचा पूर्ण विकास होऊन बुद्धीतत्त्व उत्क्रांत मानवी मनांत नुकतेंच डोकावूं लागले होतें. मथुरेंत कंस हा महापराक्रमी तसाच बुद्धिमान् राजा राज्य करीत होता. तर उत्तरेंत धृतराष्ट्र राजा आपल्या बुद्धि, वैभव, पराक्रम या गुणांनीं नांवारूपास येत होता.

## कृष्णावतारी दुहेरी हेतु

उत्क्रांतीतील कोणतेंहि एक तत्त्व पूर्णावस्थेला पोहोंचून त्या ठिकाणीं दुसरें श्रेष्ठ तत्त्व पदार्पण करतें, त्या वेळेला संधिकाल निर्माण होऊन नेहमींच मानवजातीची दिशाभूल होते. इकडे मथुरेंत आपण फारच बुद्धिमान असून, राज्याचा बंदोबस्त आपण आपल्या बुद्धिसामर्थ्यानें करूं अशी दिशाभूल होऊन कंस आपला प्रेमळपणा—निव्वळ दुबळेपणा आहे असें समजूं लागला व आपल्या फार जगलेल्या वृद्ध पित्याला, उग्रसेनाला बंदींत टाकून राज्योपभोग घेऊं लागला. आपलें अतिशय प्रेम असलेल्या सख्या बहीणीला देवकीला वरातींत रथांत बसवून तो रथ आवडीनें हांकणारा कंस, केवळ आकाशवाणी झाली म्हणून सर्व प्रेम सोडून तिला बंदिखान्यांत घालण्यास सज्ज झाला. व त्याप्रमाणें करून त्यानें वसुदेव देवकीचा छळ मांडला; तर उत्तरेंत धृतराष्ट्र आपल्या सख्या भावाच्या पंडूच्या मुलांचे हक्क आपल्या पुत्रांच्या घशांत कसे जातील याबद्दल आपल्या कुटील बुद्धीनें डाव रचूं लागला. या सर्वांचा परिणाम उत्तरेंतील तशीच दक्षिणेंतील सर्व प्रजा हवालदील होण्यांत झाला. अन्यायाला व छळाला कांहींच सुमार राहिला नाहीं. व भरत खंडांत ठिकठिकाणीं प्रजाजनांचा अनान्वित कोंडमारा होऊन त्यांच्यामध्यें रुजून फोफावलेली भक्तीप्रेमाची पालवी करपून जाऊं लागली. ही प्रकर्षाला पोहोंचलेली उदात्त भक्तीची पालवी तशीच जोपासून, नुसते उदयाला आलेलें बुद्धीतत्त्व बालपणींच कुटील अवस्थेंत न जाऊं देणें हा श्रीकृष्ण अवताराचा दुहेरी हेतु होता.

## परब्रह्म जन्म घेते तेव्हां—

मानवी शरीराच्या जडांतून निर्माण झालेले संस्कार व त्या संस्कारांतून उदय पावलेलें मन व मनांतून नुकतीच डोकावूं लागलेली बुद्धि हा जडाचा चैतन्यापर्यंतचा प्रवास सुलभ सुखरूपतेनें व्हावा व त्यांत अडथळा येऊं नये हा उदात्त हेतु साधण्यासाठीं आंधळें भक्तियुक्त मानवी मन, डोळस बुद्धि तत्त्व धारण करतें न करतें तोंच—त्याचें निर्व्याज, निर्मळ बुद्धींत रूपांतर व्हावें—म्हणून श्रीकृष्ण जन्माला आले. बुद्धितत्त्व जेव्हां प्रकर्षाला पोहोंचेल व त्यांतून अतीन्द्रीय संवेदना म्हणजे Intution जागत होईल. आणि ती वेळ आतां जवळच आली आहे. तेव्हां ही अतीन्द्रीय संवेदना स्वच्छ, निर्मळ राहावी व सुंदरतेनें प्रकर्षाला पोहोंचावी म्हणून पुन्हां प्रभूना निश्चित जन्म घ्यावा लागणार आहे. परब्रह्म जेव्हां मानवी शरीर धारण करते, म्हणजेच

जडाच्या स्वचैतन्यानें अवलंब करतें—तेव्हां त्यामागें परब्रह्माचे अनेक उद्देश असतात. अगदीं जडापासून बोलायचें म्हणजे—जड सृष्टीच्या गर्भापासून म्हणजे अगदीं पाबाळापासून जडाला चैतन्याकडे ढकलणें म्हणजे मातीच्या कणाकणांना नवचैतन्य देऊन त्यांतल्या किती एकांच्या योन्या बदलणें व त्यांस वरच्या योनींत घालणें झाडांच्या मुळांना, वेलींना, वृक्षांना त्यांचे ठिकाणीं जरुरीप्रमाणें उष्ण किंवा शीतल रस निर्मिती करून त्याचा तजेलदारपणा वाढवून त्याचे ठिकाणीं सुंदर, पूर्वींपेक्षां मोठालीं, निरनिराळ्या रंगाचीं फुलें व फळें निर्माण करणें, पक्ष्यांच्या व पशूंच्या संस्कार निर्मितींत जास्त जास्त—वात्सल्य, प्रेम, उद्योगप्रियता यांची भर घालणें व त्यांची जोपासना करणें व त्यांस पुढील योनींत जन्म घेण्यास जास्त जास्त क्षम करणें, यापासून तों थेट रानटी जमातींत संस्कृति निर्माण करणें व सुसंस्कृत समाजातून निवडक कांहीं मंडळीस शब्दांतून, काव्यांतून, संगीतांतून, मंत्र नादांतून, वाङ्मयांतून दिसत असलेलें चुटपुटतें ब्रह्मदर्शन त्यांच्या ठिकाणीं स्थिरावणें, व अध्यात्म प्रान्तांत अगोदरच विहार करणाऱ्या लोकांतून कांहीं निवडक लोकांस प्रत्यक्ष दर्शन देऊन त्यांतून साधुसंत ऋषी, महर्षि निर्माण करणें, हे असे आणि अनेक दुसरे हेतु प्रत्यक्ष परब्रह्म जन्म घेतें तेव्हां त्या जन्मास कारण असतात.

देवकीची प्रसूतीची वेळ जसजशी जवळ येऊं लागली, तसतशी तिच्या गोंडस अवयवांतून कधींही न अनुभवलेली अशी—सत् चिद् आनंद—या त्रयींची सुंदर समन्वय करणारी आत्यंतिक सुखसंवेदना थैमान घालूं लागली. जणुंकाय आतां एकाच क्षणार्धात, सर्व निसर्गसृष्टि जडाजडासहित ' सत्चिदानंद ' या मधुर बोलाचा सतत निनाद करणारा घुंगुरवाळा आपल्या दोन्हीं चरणांत बांधून, सर्व विश्वगोलाला एक दिव्य नृत्यानुभव देण्यास सज्ज झाली आहे असें तिला वाटूं लागलें व तिचा श्वास परमात्म प्रभूच्या आदीश्वासाशीं एकरूप होऊं लागला. तिचें हें आठवें बालक दुष्ट कंसाला पायदळीं तुडवून सर्व विश्व खात्रीनें सुखी करणार याबद्दल महान् मंगलमय ' समाश्वसि ' ' समाश्वसि ' अशी शक्तिमान् भावना तिच्या अन्तःकरणांत निर्माण झाली व ती अतीव मृदु शब्दांत योगश्रेष्ठांना शोभेल, अशी दिव्य प्रार्थना स्वतःशींच पुटपुटूं लागली.

## देवकीची प्रार्थना :

हे प्रभो—चराचराच्या श्वासाशीं माझा श्वास एकरूप करतांना जडाजडाबरोबर मला निश्वास सोडावयास लावतांना ज्या ठिकाणाहून विश्वाचा अगदीं पहिला श्वास निर्माण झाला, त्या ठिकाणीं तूं मला घेऊन चल. माझ्या हृदयाच्या वरखालीं होणाऱ्या हेलकाव्या-बरोबर—मातीच्या कणाकणाचें स्पंदन खालींवर होऊं दे. माझें हें हृदय हालून जणुं कांहीं सुगंधित निश्वास टाकीत आहे. त्या बरोबर निसर्गाचें, पानाचें आणि फुलफळांचें सुद्धां हृदय सुगंधित होऊं दे. माझ्या श्वास स्पंदनाबरोबर घरट्यांत खुशाल झोपीं गेलेल्या चिमुकल्या पक्षांच्या हृदयांत दिव्य स्पंदन होऊं दे व त्यांत माझ्या हृदयांत निर्माण झालेला व वायुबरोबर तरंगत जणाऱ्या दिव्य संगिताचे कोमल मधुर पण अस्पष्ट स्वर शिरूं दे. घोर जंगलांत, गुहेंत निद्रित असलेल्या हिंस्र पशूंच्या मोठाल्या डोळ्यांत माझ्या डोळ्यांतील चराचराचें प्रेम प्रतिबिंबित होऊं दे व मानवाच्या अंतःकरणांतले विचार

कल्पना समूह–बुद्धी वैभवानें प्रकाशणारें दिव्यज्ञान–हें सर्व माझ्या हृदयांतल्या तेजानें उजळून जाऊन दिव्य होऊं दे. व ह्या जडाजडांच्या सर्व संवेदनाना संवेदना सम्राट असा जो चैतन्यप्रभु तूं–त्या तुझी भेटें होऊं दे व सर्व विश्व आत्यंतिक सुखांत न्हाऊन तुझ्या चरणीं विनीत होऊं दे.

**बंदिखान्याला राजवाड्याचें स्वरूप :**

देवकीच्या या प्रार्थनेबरोबर तात्काळिक, वैकुंठांत परब्रह्म गहिंवरलें. शांत, अव्यय, निराकार आणि निरंजन अवस्थेंत झोपलेल्या परब्रह्माच्या ठिकाणीं चळवळ सुरू झाली व त्या शुभ्र बर्फाच्छादित धवल कर्पासमय 'योगीनाम् ध्यानगम्यम्' अशा ब्रह्मांडाच्या आदिअन्ताच्या उगमप्रदेशांतून महान् मंगलमय असें परब्रह्म साकार होण्याच्या इर्षेनें एकाएकीं वीज कडाडावी व तिनें भोवतालचा भाग सुंदर सोनेरी चकचकीत व्हावा त्याप्रमाणें ताडकन् 'शंखचक्र गदा हातीं' घेऊन पिवळा पितांबर नेसलेल्या सुंदर पराक्रमी आजानुबाहू स्वरूपांत बाहेर पडले. त्याच्या विशाल वक्षस्थळावर वैजयन्तिमाला चमकत होती व टपोऱ्या डोळ्यांतलें ब्रह्मांडाविषयीं आत्यन्तिक प्रेम, दुष्टांचा संहार करण्यासाठीं निर्माण झालेल्या अग्निस्फुलींगानें झाकाळून गेलें होतें. सहस्र सोनेरी किरणांनीं पृथ्वीतलाला न्हाऊन टाकणाऱ्या भगवान् दिनमण्याप्रमाणें उंच उंच आकाशांतून ते तीव्र सोनेरी किरण कंसाच्या बंदिखान्याकडे एकाएकीं धावूं लागले व त्या जुनाट जीर्ण बंदिखान्याला क्षणांत सोन्यानें मढवलेल्या राजवाड्याचें स्वरूप प्राप्त झालें. 'परित्राणाय साधूनाम् । विनाशायच दुष्कृताम्–धर्म संस्थापनार्थाय'–असा तो आजानबाहू महापुरुष तें स्वर्गाचें सुकुमार सुमन, तो मोहक श्यामल नंदकुमार पृथ्वीतलाकडे एकाएकीं झेपावूं लागला. हा नयन मनोहर युगायुगानंतर क्वचित दृष्टीस पडणारा 'परब्रह्मगर्भसंभूतं' असा समारंभ डोळे भरून बघण्यासाठीं स्वर्गांत देवादिकांची एकच गर्दी उडाली. हा चराचराचा प्राण, हें जडाजडांतील चैतन्य, हा संवेदना सम्राट चराचराला सर्वव्यापी महासागर जलाशयांत माघारा फिरून प्रेमानें कवटाळतो, त्या प्रमाणें कवटाळण्यास धावूं लागला. मातीच्या कणाकणांना जणुं चैतन्याचे असंख्य नयन एकाएकी प्राप्त व्हावेत व सर्वच पृथ्वीचा एक जडगोल संवेदित होऊन नाचूं लागावा, त्याप्रमाणें सृष्टि वसंतागर्मी विविध रंग धारण करून नाचूं लागली. झाडें झुडपें व गवतें, पर्णापर्णांतून चैतन्य ओघ जोरानें फोफावून वाहूं लागल्यामुळें न समजणारी कंपायमान मधुर अनुभूति आल्यामुळें न हालतां निःस्तब्ध उभी राहिली. पक्षांना त्यांच्या घरट्यांत तर पशूंना त्यांच्या गुहेंत गाढ निद्रा आली. मानवांना एक महान् मंगलमय नवयुगच आपणाकडे धांवत येत आहे असें वाटलें. युगकर्ता श्रीकृष्ण वेगानें देवकीच्या दिशेनें आपली शुभ पावलें टाकूं लागला.

श्रीकृष्णाची जन्म वेळ अगदीं जवळ आली. आकाराच्या सीमा प्रान्तापलीकडून ज्या मानवी आकाराला सर्व विश्वानें 'जगद्गुरू जगद्गुरु म्हणून वंदन करावें' असा हा शुभाकार, श्यामल श्रीकृष्ण गोंडस बालकाचें स्वरूप घेऊन जन्मास येण्यास अधिर झाला. देवकीला शांत निर्व्याज, निराकार, निरंजन परब्रह्म–आदि स्वरूपांत पूर्णपणें विलीन झाल्यामुळें योगनिद्रा आली. चराचरासहित विश्व वादळपूर्व शांतता अनुभवीत निस्तब्ध उभें राहिलें.

---

ह. भ. प. श्रीदासगणू महाराजकृत श्रीभक्तलीलामृत—

# दत्तावतार नरसिंह सरस्वती

## ( उत्तरार्ध )

एकदां आळंदींत लग्न मुंजींची एकच गर्दी उसळून गेली होती. घरोघर कार्यें ! जिकडे तिकडे ताशेवाजंत्री वाजत होतीं. स्वामी समर्थ नरसिंह सरस्वती यांचें लक्ष या घटनेकडे लागून राहिलें होतें. बाळाबुवा हा त्यांचा एक परमभक्त. त्याला हांक मारून स्वामीमहाराज म्हणाले, 'अरे बाळा ! या माघमासांत जिकडे तिकडे लग्नमुंजींची गर्दी उसळून गेली आहे. मग तुझ्या घरांत कां होऊं नये एखादें कार्य ? तूं आपल्या मुलाची— त्र्यंबकची मुंज कां करीत नाहींस ? माघ शुद्ध पंचमीला फार चांगला मुहूर्त आहे. त्याचें टिपण पहा बरें ! मला वाटतें 'शुभस्य शीघ्रम्' या न्यायानें उद्यांचाच मुहूर्त धरूं या. त्याप्रमाणें जा आणि गांवांतील लोकांस आमंत्रणें देऊन ये !'

यावर बाळाबुवा म्हणाले, 'महाराज ! मी फार गरीब आहे. कार्य पार पडायचें म्हणजे जवळ थोडें तरी द्रव्य पाहिजे कीं नाहीं ? आणि कार्यासाठीं जें पाहिजे त्याचा तर माझ्यापाशीं अभाव आहे. माणसानें शक्तीप्रमाणें जबाबदारी शिरावर घ्यावी. माझ्यांत जी ताकद नाहीं. ती आहे असें मी कां भासवावें ? अंथरूण पाहून पाय पसरणें बरें !'

यावर स्वामीजी म्हणाले, 'बाळा ! तूं वेडा आहेस झालें ! पैसा असो नसो; त्याची काळजी तूं कां करतोस ? तुझ्या मुलाच्या मुंजीचा मक्ता माझ्याकडे ! मी तुला दहा रुपयांत मुंज करून दाखवितों. जा आणि आपल्या वाण्याला बोलाऊन आण माझ्याकडे ! बाळानें त्याप्रमाणें करून १०–१२ पानांची तयारी केली. स्वामिनीं रातोरात पुण्यास तात्या रायरीकरांकडे निरोप पाठवून जरूर तो कपडालत्ता आणण्याची व्यवस्था केली. दुसरे एक भक्त अण्णासाहेब पटवर्धन तेहि त्या दिवशीं सहजासहजीं आले. रातोरात दारांत सुंदर मंडप घातला. त्याला आंतून कपड्याचें छत लाविलें. शोभेसाठीं रंगीबेरंगी झालरी सोडल्या. आसपासच्या ५।१० गावांतील लोकांस आमंत्रणें पाठविलीं.

### स्वामी महाराजांची कृपा

स्वामीमहाराजांची कृपा झाल्यावर काय कमी पडणार आहे ? घरांत दासदासी खपूं लागल्या. उणीव कशाची भासत नव्हती. अडचण आलीच तर ती आपोआप दूर व्हावयाची. स्वयंपाक सिद्ध झाला होता वीस पानांचा आणि भोजनास किती माणसें बसलीं व संतुष्ट होऊन गेलीं त्याची गणतीच करतां येणार नाहीं. स्वयंपाक संपतच नव्हता. ही स्वामींची अपार शक्ति होती. अशा रितीनें बाळाबुवास कशाचीहि फिकीर करावी न लागतां मुंज अत्यंत यशस्वीरीतीनें पार पडली. स्वामी म्हणजे अनाथांची माऊली. तिची कृपादृष्टी वळल्यावर उणीव कशाची भासणार ? भक्तांचें संकट दूर करण्यासाठीं ते तत्परतेनें झटत असतात.

त्यानंतर नवमीला स्वारी सज्जनगडावर गेली आणि स्वामी महाराज त्याच दिवशीं आळंदींतहि होते. मूर्ती एकच, परंतु ती दोन ठिकाणीं दृश्यमान झाली व वावरली. सर्वांना आनंद व समाधान देणें हें महाराजांचें ध्येय.

महादेव चिमाजी आपटे यांचें नांव आपण ऐकिलें असेलच. ते स्वामींचे भक्त होते. एकदां त्यांना घेऊन ते पुण्यास जात होते; परंतु स्वामीजी मध्येंच गुप्त झाले! अशा स्थितींत ते मोठ्या पेंचांत सांपडले. त्यांनीं शक्य तेथें शोधाशोध व धांवपळ केली; परंतु त्यांचा पत्ता कांहीं लागला नाहीं. ते नाहींसें झाले ते आळंदींत उमगले!

चिंतामणशास्त्री वरूडकर या नांवाचे एक विद्वान गृहस्थ होते; परंतु त्यांच्याठायीं नास्तिकपणा अपरंपार भरलेला होता. एकदां तें शास्त्रीबुवा आळंदीस गेले व स्वामीजीं-बरोबर निरनिराळ्या विषयांवर वादविवाद करूं लागले. एवढेंच करून ते थांबले नाहींत. तर सर्व लोकांना मोठमोठ्यानें गर्जून सांगूं लागले की, काय तुम्हांला वेड लागलें आहे! काय समजतें आहे याला? हा भोंदू आहे. अशा माणसाच्या नादीं काय लागलां अहांत तुम्हीं? याचा हा लुबाडण्याचा धंदा आहे!

## शास्त्रीबुवांचा गर्वपरिहार

अशारीतीनें स्वामीजींची निंदा करीत करीत तो पुण्यास लाकडीपुलापर्यंत येऊन पोहोंचला. तेथपर्यंत तो आपल्याच गमज्यांत होता. भयंकर गर्व झाला होता त्याला.

इकडे स्वामीजींचे भक्त त्यांना ( स्वामींना ) म्हणाले, किती दुष्ट प्रवृत्तीचा माणूस आहे हा! याला सारासार विचार कसा नाहीं? सत्पुरुषांची निंदा करण्याची दुर्बुद्धि त्याला कुठून झाली समजत नाहीं.

यावर स्वामीजी म्हणाले, "निंदा आणि स्तुति, दोन्ही आम्हांला सारखींच आहेत. त्याबद्दल दुःख मानण्याचें कांहींच कारण नाहीं. शब्दाभिमान अत्यंत वाईट आहे. जे वृथा बडबड करण्यांत पुरुषार्थ मानतात, त्यांचेसारखे मूर्ख तेच. त्या तोडीचे मूर्ख सांपडणार नाहींत. सिद्धांत तर बडबड, शब्दाभिमान अतिशय घातक आहे. त्यांचें फळ त्यांच्या पदरांत ताबडतोब पडल्याशिवाय रहाणार नाहीं. हे वरूडकर शास्त्री येथून जरी गेले असले तरी ते परत येथें लौकरच आल्याशिवाय रहाणार नाहींत. तुम्हीं स्वस्थ मनानें येथें बसून काय होतें ते पहा म्हणजे झालें.

आणि शास्त्रीबुवा जे निंदा करीत गेले त्यांची अवस्था काय झाली ती पहा! त्यांच्या पोटांत एकाएकीं भयंकर कळ येऊं लागली. जगतो कीं मरतो अशी त्यांची अवस्था झाली! 'मी स्वामीजींची निंदा केली; तिचें का हें फळ मिळालें?' सारे उपाय हरले. शास्त्रीबुवा स्वामीजींचा आर्त स्वरानें धावा करूं लागले. म्हणाले, 'हे स्वामी समर्था! कृपानिधे! माझ्यावर कृपेची पाखर घाला.' पोटांतील कळ कमी होत नव्हती. शास्त्रीबुवांच्यानें रहावेना. प्रत्येक क्षण कठीण वाटूं लागला. ते तडक मागें फिरले व परत आळंदीस स्वामीजींपाशीं आले व त्यांच्या पायांवर लोटांगण घालून गडबडा लोळूं लागले. सारा अभिमान लयास गेला! स्वामीजींस भक्तिपूर्वक नमस्कार करतांच पोटांतील

कळ एकदम थांबली ! स्वामीजी म्हणजे प्रत्यक्ष दत्तावतार होते. ते सिद्ध तसेच महायोगी होते.

त्यानंतर स्वस्थपणें त्या वरूडकर शास्त्री बुवांस स्वामीजींनीं सदुपदेश केला व त्याचा भ्रमनिरास करून टाकिला. अभिमानाच्या सांपडलेल्या तावडींत शास्त्रीबुवाची सुटका झाली.

## देव मामलेदारांचें आगमन

एकदां स्वामीजी पुण्यांत होते. तेथें असतां एकदां मोठा चमत्कार घडला. तेथें तात्यासाहेब रायरीकर या नांवाचे एक श्रीमान्, कुलीन व उदार वृत्तीचे गृहस्थ रहात होते. त्यांच्या आसपास बरीच भक्त मंडळी बसली होती. अण्णासाहेब पटवर्धन हेही त्यावेळीं तेथें होते. ते स्वामीजीना पानाचा विडा खलबत्त्यांत कुटून देत होते. इतक्यांत स्वामीजी त्यांस म्हणाले, 'चला आपण बाहेर फिरायला जाऊं या. गाडीला घोडे जोडा. त्यांची आज्ञा होतांच घोडे जोडून गाडी तयार झाली व त्यांच्याबरोबर तेथें असलेली सारी मंडळी उठली व फिरावयास जाण्यास बाहेर पडली. पुन्हां बेत बदलला. स्वामीजी खालीं बसत म्हणाले, ' आतां नको ! येथेंच बैठक घाला. बसूं या कांहीं वेळ. यशवंत ( देवे मामलेदार ) भेटायला येत आहेत. ते परमेशाचे परम भक्त आहेत. दया, क्षमा, शांति या गुणांचे साक्षात् पूर्णावतार आहेत." याप्रमाणें बोलणें चाललें आहे तोंच यशवंतराव गाडीवर आले. दोन सत्पुरुष एकमेकांस प्रेमानें भेटले. एक विष्णु तर एक शंकर, एक वशिष्ठ तर एक पराशर, एक चिंतामणी तर एक कोहिनूर यापेक्षां त्यांचे वर्णन आणखी कोणत्या शब्दानीं करावयाचें ! तेथें दोघांचाही कांहीं संवाद झाला. ईश्वरीज्ञानासंबंधींच्या गोष्टीस जणूं काय महापूर आला होता. त्या गोष्टी सर्वसाधारण लोकांस समजण्यासारख्या नव्हत्या.

अशा रीतीनें श्री नरसिंह स्वरस्वतींनीं नाना प्रकारच्या लीला करून दाखविल्या. लोक सन्मार्गास लाविले व शके अठराशें सात ( सन १८८५ ) या सालीं पौष महिन्यांतील पौर्णिमेस ते निजधामास गेले. त्यांच्या समाधीच्याजागीं भक्तजनांनीं फार मोठा उत्सव केला.

स्वामीजींचे शिष्य असंख्य होते. त्यांत नारायणबुवा हे एक सिद्ध महंत होऊन गेले. त्यांची समाधि धुळ्यांत आहे, दुसरे माधव दांडेकर, त्यानीं आळंदींतच आपला देह ठेविला. अण्णासाहेब पटवर्धन हेही त्याचे सुविख्यात भक्त होऊन गेले. ते पदवीधर होते; परंतु त्यांच्याठायीं जरासुद्धां अभिमान नव्हता. त्यांचें वैद्यकीय अर्थात् आयुर्वेद शास्त्राचें ज्ञान अतुलनीय होतें. त्यांना साक्षात् अश्विनी कुमारांची उपमाच शोभेल.

नरसिंह सरस्वती आख्यान आहे. तें जे कोणी भक्तिभाव-
पव मनकामना पूर्ण झाल्याशिवाय रहाणार नाहींत.

---

# श्रीगुरुसत्कथामृतलता

***********************

## ( वंदन )

श्रीएकदंतपद वंदुनि शारदाही । ते पुण्यशील बहु पूर्वज संत पाहीं ।। वाग्यज्ञ आवरुनि सिद्धकृपा मिळाया । वंदूं तया प्रभुवरा गुरुदत्तराया ।। १ ।। ब्रह्मा वदे कलिसि कीं गुरुपादसेवा । माहात्म्य जें अमुप दुर्लभ देवेदेवां ।। सांदीपनीचरित चित्तिं बरें ठसाया । वंदूं तया० ।। २ ।। भक्ताभिमान धरुनी भगवंत घेतो । नानावतार जगतीं असकृत् प्रभू तो ।। हें अंबरीशचरितावरुनी शिकाया । वंदूं तया० ।। ३ ।। अत्रीमुनी तप करी घनघोर जेव्हां । ब्रह्मा हरीहरहि तुष्ट अतीव तेव्हां ।। तत्पुत्र होती जगिं धन्य तदीय जाया । वंदूं तया० ।। ४ ।। 'आपाळ'—नामक सुसात्विक विप्र होता । पीठापुरी तदिय सद्गुणि तेविं कांता ।। 'श्रीपादवल्लभ' तदीय सुपुत्र गाया । वंदूं तया० ।। ५ ।। दे आत्मलिंग शिवशंभु दशाननासी । तैं पाठवी हरि बळेंचि गजाननासी ।। तें स्थापि भूमिवरि तो जन उद्धराया । वंदूं तया० ।। ६ ।। गोकर्णिंचा सुमहिमा मुनि गौतमें कीं । सांगुनि उद्धरित कल्मषपाद लोकीं ।। श्रीपाद राहति तिथें सुतपा कराया । वंदूं तया० ।। ७ ।। अत्यंत मूढ निजपुत्र म्हणून दुःखी । पुत्रात्मघात करण्या विधवा विलोकी ।। ठेवीत मस्तकिं करासि कृतार्थ व्हाया । वंदूं तया० ।। ८ ।। होता भला रजक एक कुरूपुरांत । सेवा मठापुढति नित्य करी निवांत । त्यीं त्या दे वर प्रबळ भूपचि शीघ्र व्हाया । वंदूं तया० ।। ९ ।। तो 'वल्लभेश' म्हणूनी द्विज एक भक्त । द्रव्यार्थ चोर वधिती कपट कृतांत ।। श्रीपाद तैं प्रगटुनी उठवी स्वकार्या । वंदूं तया० ।। १० ।। होता करंजपुरिं विप्रहि माधवाख्य । अंबा म्हणोनि ललना गृहिं सर्व सौख्य ।। पुण्योदयें प्रगटला 'नृहरी' जगीं ह्या । वंदूं तया० ।। ११ ।। पाहोनिया अमित अद्‌भुत बाललीला । मातापिता करिति ते व्रतबंधनाला ।। वाराणसीप्रति निघे तप आचराया । वंदूं तया० ।। १२ ।। संन्यास घेउनि बळें गुरुसंप्रदाया । जो वाढवी निजकृपें जन उद्धराया ।। शूलव्यथा शमवि विप्र सुखी कराया । वंदूं तया० ।। १३ ।। सायंसुराख्य निजभक्त वरप्रदान । रक्षीयला निजबळें प्रभुनीं दयेनें ।। जाखाइ—नामक सतीप्रति तोषवाया । वंदूं तया० ।। १४ ।। झाले बहूत जन शिष्य तयांसि धाडी । तीर्थांसि आपण निरंजनि दीस काढी ।। तीर्थेंहि वंदिति जयासि पवित्र व्हाया । वंदूं तया० ।। १५ ।। एकासि धौम्यमुनि-शिष्यकथा कथूनी । धाडीयलें निजगुरुप्रति शांतवोनी ।। दावी जनासि गुरुभक्ति भवा तराया । वंदूं तया० ।। १६ ।। कृष्णातिरीं मग पहा भुवनेश्वरीला । भेटोनि, पैलतिरिं आवडिं वास केला ।। विद्या जडासि दिधली नामतांसि पायां । वंदूं तया० ।। १७ ।। विप्रांगणस्थितच्च वेलहि घेवड्याचा । तोडोनि टाकि बघण्यास्तव भाव साचा ।। सद्रत्नहेमनिधि देइ दरिद्रि जाया । वंदूं तया० ।। १८ ।। कृष्णानदी मिळत जेथहि पंचगंगे । तो जातसे अमरपूरिं पहां निजांगें ।। चौसष्ट योगिनि जया

पुजिती तराया । वंदूं तया० ॥ १९ ॥ होती शिरोळपुरिं एक सुविप्रपत्नी । आराधि सद्गुरुसि ती सुत दे म्हणोनी ॥ तीतें दिल्हाहि वर सत्वरि पुत्र व्हाया । वंदूं तया० ॥२०॥ पुत्रामृताप्रतिहि दे नच जाळण्यासी । विश्वास तो गुरुरूपदीं दृढ कीं जियेसी ॥ सत्पुत्र तो उठवि स्वप्निंहि येऊनीयां । वंदूं तया० ॥२१॥ सद्विप्रगेहिं महिषी खरि वांझ होती । भिक्षेसि जाउनि तया स्थलिं बैसताती ॥ दोही म्हणूनि वदतां पय ये दुहाया । वंदूं तया० ॥ २२ ॥ ऐकोनि कीर्ति नृप ये शरण त्वरेंसीं । या गाणगापुरिं चला विनवी वचेंसीं । ने ब्रह्मराक्षस पहा निजमोक्षठाया । वंदूं तया० ॥ २३ ॥ लोकीं त्रिविक्रम करी कुमसीसि निंदा । तो विश्वरूप निज दावुनि देइ बोधा ॥ सद्भक्त येती बहु नित्य जया पहाया । वंदूं तया० ॥ २४ ॥ उन्मत्त विप्र छळिती सकलां द्विजांसी । ते मागती विजयपत्रचि आपणासी ॥ आणी त्रिविक्रम जयाप्रति गर्व जाया । वंदूं तया० ॥ २५ ॥ प्रेमें किती तरि तया समजाविलें कीं । सांगूनि वेदरचना करि कोण शेखीं ॥ भोगाल कर्म अपुलें म्हणती जनीं या । वंदूं तया० ॥२६॥ भस्माभिमंत्रण करोनिहि बोलविलें । वेदोक्तमंत्र पतितामुखिं हो स्वलीलें॥ शापोक्तिनें अधम पावति मृत्युठाया । वंदूं तया० ॥२७॥ त्या अंत्यजासि उपजे मति विप्र व्हावें । तत्पूर्वकर्म वदती म्हणुनि स्वभावें ॥ होई न मान्य; कथिती तनु तैं धुवाया । वंदूं तया० ॥ २८ ॥ तेव्हां त्रिविक्रम पुसे गुज काय हे जी । भस्मप्रभाव कथिला मग त्या समाजीं ॥ तैं धन्य धन्य म्हणुनी नमिताति पायां । वंदूं तया० ॥ २९ ॥ माहूरिं विप्रसुत रोगि निराशचित्त । घेऊनि येई ललना गुरुदर्शनार्थ ॥ तो मृत्यु पावत तदा प्रगटेचि ठाया । वंदूं तया० ॥३०॥ बोधोनि धर्म सगळे तिजला सतीचे । पाही करोनि निजधैर्यहि बापुडीचें ॥ आली तदा शरण आग्रह सोडुनियां । वंदूं तया० ॥ ३१ ॥ निर्वासनात्मक विशुद्धचि चित्त होतां । रुद्राभिषेकजल सिंचुनियां अतौता ॥ भर्ता जिवंत करिती निजसौख्य व्हाया । वंदूं तया० ॥३२॥ सांगूनि गोष्टि बरि कुक्कुटमर्कटांची । वेश्येचिही विमलभक्तचि जी शिवाची ॥ रुद्राक्षधारणफळाहि कथी स्वमाया । वंदूं तया० ॥ ३३ ॥ काश्मीरराजसुतमृत्यु पराशरें कीं । तो टाळिला करुनी अतिरुद्र शेखीं ॥ जो रुद्रसूक्त-महिमा कळवी जनां या । वंदूं तया० ॥ ३४ ॥ रुद्राक्षरुद्रमहिमा कथुनी सतीला । सीमं-तिनीसुचरितामृतही तियेला ॥ सौभाग्यवर्धक शिवव्रत दे कराया । वंदूं तया० ॥३५॥ घेतां परान्न किति दोषहिं लागताती । विप्रस्त्रियेप्रति बरें समजाविताती । आन्हीक कर्म पुसतां कथिती कळाया । वंदूं तया० ॥ ३६ ॥ पूजान्नसेवनविधी, शयनान्त कर्म । अत्यंत विस्तृतपणें शिकवी स्वधर्म ॥ देई तया द्विजवरा वर सौख्य व्हाया । वंदूं तया० ॥ ३७ ॥ भिक्षा करूं म्हणुनि भास्कर विप्र आला । स्वल्पप्रमाण घृत घेउनि तंडु-लाला ॥ चारी सहस्र जन तृप्त करी स्वमाया । वंदूं तया० ॥ ३८ ॥ गंगाख्य वृद्धवयसा ललनाहि वंध्या । नाहीं अपत्य म्हणुनी जनिं होय निंद्या ॥ जो देतसे वर सुता—सुतही पहाया । वंदूं तया० ॥ ३९ ॥ एक्या द्विजा प्रबळ कुष्ट निजांगिं होई । येतांच्चि तो शरण शुष्कचि काष्ठ देई ॥ त्याचा करी तरु कुपेंहि विशुद्ध काया । वंदूं तया० ॥ ४० ॥ गंगाधरात्मज—सुपूर्वज-पुण्यपात्रा । त्वष्टयाचिया निजमुखें बरि काशियात्रा ॥ सांगूनि काशिहि दाविति योगमाया । वंदूं तया० ॥ ४१ ॥ कौंडिण्य—सन्मुनि कथा वदुनी स्वबान्चें । पाळी

म्हणे व्रत अनंतचतुर्दशीचें । सद्भाग्यवृद्धि–वर दे भजनीं रमाया । वंदूं तया० ॥४२॥ ने संतुका नयन झांकुनि जो निजांगें । श्रीपर्वतावरि पळांतचि योगमार्गें ॥ तेथेंहि तो बघतसे निजयोगिवर्या । वंदूं तया० ॥४३॥ कुष्ठी द्विज व्यथितचित्त करि तपाला । देवी वदे शरण जा नृहरीपदाला ॥ व्याधी हरी सुचवुनी निजगुण गाया । वंदूं तया० ॥४४॥ होता कवी चतुर हिप्परगी–पुरींत । कल्लेश्वरावरि कवित्व सदा करीत ॥ केला स्वशिष्यवर दावुनि दिव्य माया । वंदूं तया० ॥ ४५ सच्छिष्य सातजण इच्छिति सद्गुरुला । न्याया दिवाळी करण्या अपुल्या पुरीला ॥ रूपेंहि घेई तितुकीं वसुनी स्वठाया । वंदूं तया०॥४६॥ सद्भक्त शूद्र करि नित्यचि वंदनाला । कापूनि टाकविति कोमल यावनाळा । देती पुन्हां पिकवुनि बहू धान्य खाया । वंदूं तया०॥४७॥ कैशी नदी अमरजा बहु पुण्यखाणी । गंधर्वपूर-इतिहास वदे स्ववाणी ॥ रत्नाइ-कुष्ठ हरिलें अघटीत माया० । वंदूं तया ॥४८॥ शंभूसि पार्वति पुसे अति गुह्यवार्ता । सांगे तियेस शिव तो गुज 'गुर्विगीता' ॥ लावीत मंत्रमयि सिद्ध मुखें वदाया । वंदूं तया० ॥४९॥ वैदूरपूरनृपती निज शिष्य साचा । पूर्वील तो रजक ओळखुनी तयाचा ॥ नेला लयासि झणि स्फोटक, सौख्य व्हाया । वंदूं तया० ॥५०॥ ऐसें चरित्र सुविचित्र करूनियां कीं । घाली पदातळिं पहा कालिकाळ लोकीं ॥ श्रीशैल्यदर्शनमिसें त्यजि जो स्वठाया । वंदूं तया प्रभुवरा गुरुदत्तराया० ॥५१॥ सद्भक्त शिष्यजन सर्वहि दुःखि होती । त्यांसी गुरू कथुनि बोधहि शांतवीती ॥ कीजे त्रिकाळ बरि आरति सौख्य व्हाया । बोले, तया गुरुवरा नमुं दत्तराया० ॥५२॥ मीं ठेवितों मठिं मदीयचि पादुका कीं । आराधनेसि सकलेप्सितदाचि लोकीं ॥ संतुष्ट मी बहुपरा गुणगायनानें । घ्या भोगमोक्षहि कथामृतदिव्यपानें ॥५३॥ ऐसें वदोनि निजभक्त-गणानुरागी । श्रीमल्लिकार्जुन वनाप्रति जाय वेगीं ! पुष्पासनावरि बसोनि सरित्प्रवाहीं । धाडी प्रसादसुमनें निजसौख्यदें हीं ॥५४॥ ऐसें चरित्र पठतां स्मरतांहि लीला । त्रैमूर्ति होती वश सत्वरि भाविकाला ॥ इष्टार्थ पूर्ण करिती भव हा तराया । सत्कीर्ति ही जगतिं नित्यचि विस्तराया ॥५५॥ गोमांचलीं जनहितार्थ वसे निवांत । माशैल नामक सुपुण्यवर स्थलांत ॥ दुर्गात्मदत्त विभु तच्चरणावरी ही । वाक्पुष्प-अंजलि समर्पिलि अल्प पाही॥५६ श्रीमत्पंतुमहानुभाव-जननग्रामीं अजापूरी कीं । झाली श्रीगुरुसत्कथामृतलता आतें तयाच्या निकी । श्रीगंगाधरपुत्र धन्य गुरुसभ्दक्ताग्रणी वंदुं या । राधाकृष्णसुता दिगंबर गुरु पायीं सदा बांधु या ॥५७॥

---

****************************************************

**—श्री. साईनाथ, कै. अण्णासाहेब दाभोळकर वाचनालय शिरडी येथें सन १९४८ ते १९५८ पर्यंतची शिल्लक असलेली श्रीसाईलीला त्रैमासिकें निम्या किंमतींत विकत मिळतील.**

****************************************************

# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद

ले० : एक साईभक्त



## अध्याय पांचवा

( पुढें चालू )

पुढें श्रीसाईनाथ आपण होऊन स्वतः कोणाजवळ बोलत नसत. कोणी कांहीं विचारलेंच तर त्याला उत्तर देत. दिवसा बैठक लिंबाच्या झाडाखालीं असे तर कधीं गांवाच्या शिवेवरच्या ओढ्याजवळ बाभळीच्या झाडाची एखादी आडवी फांदी पाहून तिच्या छायेखालीं ते बसत. कधीं कधीं तेथूनच एक मैलावर असलेल्या निमगांव गांवाच्या आसपास स्वेच्छेनें हिंडतांना बाबा आढळून येत. इतिहास प्रसिद्ध त्रिंबकजी डेंगळे यांच्या जहागिरीचें गांव निमगांव आणि तेथल्या बाबासाहेब डेंगळ्यावर साईनाथांचें फार प्रेम असे. निमगांवाला गेले म्हणजे बाबा त्यांच्याकडे जात आणि दिवसभर प्रेमानें तेथें बोलत बसत असत. या बाबासाहेबास नानासाहेब नांवाचे धाकटे बंधू होते. त्यांना पुत्रसंतान नव्हतें म्हणून बाबासाहेब मनांत फार दुःखी असत. नानासाहेबांच्या पहिल्या कुटुंबास पुत्रयोग नव्हता म्हणून त्यांनीं द्वितीय संबंध केला. तरी पण स्थिति तीच. दैव निर्बंध अगाध होता, म्हणून बाबासाहेब नानांना साईदर्शनास पाठवीत. पुढें नानांवर साईकृपा झाली आणि त्यांना पुत्र प्राप्तीहि झाली.

साईंची कीर्ति गांवोगांव पसरूं लागली. त्यांचा महिमा वाढूं लागला आणि साई दर्शनास असंख्य लोक येऊं लागले. नगरास देखील ही वार्ता पोंचली. नगर हें जिल्ह्याचें ठिकाण आणि सरकारी दप्तराचें ठाणें. येथें नानासाहेब डेंगळ्यांच्या फार ओळखी होत्या. चिदंबर केशव नांवाचे गृहस्थ जिल्ह्याचे चिटणीस होते. श्रीसाईसमर्थ दर्शनपात्र आहेत, करितां आपल्या इष्टमित्रांसमवेत व कुटुंबासहीत दर्शनास यावें म्हणून नानासाहेबांनीं त्यांना पत्र लिहिलें. अशा रितीनें अनेक मंडळी शिरडीस येऊं लागली. बाबांचा जसा लौकीक वाढला तसाच त्यांचा परिवारहि वाढूं लागला. जरी कोणाची संगत नव्हती तरी दिवसा बाबा भक्तमंडळींच्या परिवारांत बसलेले असत व रात्रीं शिरडींतील पडक्या मशिदींत झोंपत असत.

अंगांत पायघोळ कफनी, माथ्याला फडका गुंडाळलेला हातांत चिलीम आणि तंबाखूचें टमरेल असा बाबांचा वेष असे डोक्याचा फडका पांढरा शुभ्र धुतलेला असून डाव्या कानामागें त्याला जटांच्या केसाप्रमाणें सुंदर पीळ दिलेला असे व डोक्यावर

गुंडाळलेला असे. आठ दिवस हें शिराच्छादन बदलत नसे. बाबांच्या पायांत कधींही जोडा किंवा वहाण नसे आणि त्यांचें आसन गोणपटाचें असे. बाबा नेहमीं एका पोत्याच्या तुकड्यावर बसत असत. पाठीला तक्या तर ठाऊकच नाहीं आणि त्याची तर त्यांना केव्हांही आवडही नव्हती. तें जीर्ण तरट हीच त्यांची आवडती बैठक आणि अष्टौप्रहर तें त्या जागी असे. तें आसन आणि कमरेला एक लंगोटी याशिवाय दुसरें वस्त्रप्रावरण बाबांना माहीत नव्हतें. मशिदींत दक्षिण दिशेकडे तोंड करून डावा हात मशिदीच्या कठड्यावर आणि तेथेंच समोर पेटत असलेल्या धुनीकडे पाहत बाबा बसलेले असत. अहंकारादि वासना, नानाविध वृत्ती आणि प्रपंचादि प्रवृत्ति ह्या सर्वांची बाबानीं ह्या धुनींत होळी केली होती. ज्ञानाभिमानरूपी ओंडके या प्रखर अग्निकुंडाला पुरवून तोंडानें सदैव "अल्ला मालिक" चा जयघोष चाललेला असे. मशिद तर अवघी दोन खणांची तींतच बाबा बसत उठत निजत आणि सर्वांना भेटही येथेंच देत. भक्तसमुदाय जसा जमूं लागला तसतसे गादी तक्या आले. आरंभीं बाबांच्या जवळ जावयास सर्वांनाच धैर्य होत नसे.

सन १९१२ पासून मशिदीमध्यें बदल होण्यास खरा प्रारंभ झाला. मशिदीच्या जमिनींत ढोंपर ढोंपर खड्डे होते; परंतु भक्तांच्या भावासारखी एका रात्रींत त्या ठिकाणीं फरशी बसविण्यांत आली. मशिदीमध्यें रहाण्यास येण्याच्या अगोदर बरेच दिवस बाबा 'तक्क्यांत' राहत असत. फारच रमले होते ते त्याठिकाणीं. तेथेंच पायांत घुंगूर बांधून खंजिरीच्या तालावर बाबा नाचत आणि मधुर आवाजांत मोठ्या प्रेमानें गात असत. आरंभीं बाबांना दीपोत्सव करण्याची मोठी हौस. त्यासाठीं ते दुकानांतून तेल मागून आणीत. हातांत टमरेल घेऊन वाण्या तेल्यांच्या दुकानांत जावयाचें आणि तेलाची भिक्षा मागून आणावयाची. पणत्यांत तें तेल भरून त्या देवळांत आणि मशिदींत लावावयाच्या आणि सर्वत्र लखलखाट करावयाचा असा कार्यक्रम कांहीं दिवस सदोदित चाललेला होता. दीपाराधना करावयाची बाबांना अतिशय आवड असे. चिंध्या काढून त्यांच्या वाती वळवावयाच्या व मशिदींत दिवे उजळावयाचे. अशारीतीनें बाबा दिवाळीचा दीपोत्सवहि साजरा करीत. यासाठीं बाबा रोज तेल फुकट आणीत असत. एकदां वाण्यांच्या मनांत कपट आलें. ही कटकट कायमची काढून टाकण्याचा त्यांनीं सर्वांनीं मिळून कट केला. पुढें नेहमींच्या नियमाला अनुसरून बाबा त्यांच्याकडे तेल मागण्याकरितां गेले असतां त्या सर्वांनीं त्यांना नकार दिला तेव्हां काय नवल वर्तलें तें पहा! बाबा निमूटपणें मशिदींत परत आले आणि त्यांनीं सुकेच काकडे पणत्यांत ठेवून दिले. आतां तेल नाहीं म्हणून ते काय करणार आहेत याची वाणी मौज पाहत होते. मशिदीच्या जोत्यावरील टमरेलांत फारच थोडें तेल शिल्लक होतें. तें सांजवातीला देखील पुरेसें नव्हतें. बाबांनीं त्या तेलांत पाणी घातलें आणि तें सर्व मिश्रण पिवून त्यांनीं तें ब्रह्मार्पण केलें. पुढें काय झालें? बाबांनीं टमरेलांत साधें पाणी घेतलें. त्या पाण्यांत ते सुके काकडे पूर्ण भिजवून त्यांना कांडी लावून त्यांनीं दिवे पेटवून

दाखविले. पाणी पेटत आहे हें पाहून वाण्यांनीं आश्चर्यानें तोंडात बोटें घातली व आपण तेल नाहीं असें बाबांना खोटेंच सांगितलें म्हणून त्यांना मनांत भीति वाटूं लागली. तेल नसतांना देखील पणत्या अहोरात्र जळत राहिल्या. आणि वाणी साई कृपेस अपात्र ठरले, असें सर्व लोक म्हणूं लागले. बाबांचा काय हा प्रताप! असत्य भाषण करून आपण पाप केलें आणि निष्कारण बाबांना त्रास दिला म्हणून वाण्यांना पश्चाताप झाला. बाबांच्या तें मनांतही नव्हतें. त्यांना राग द्वेष नाहीं. शत्रू मित्र नाहींत. सर्वांकडे ते सारख्याच दृष्टीनें पाहत.

असो, आतां पूर्वीच्या कथेनुसार मोहिद्दीन बाबांच्या बरोबर झालेल्या कुस्तींत यशस्वी झाला. तेव्हां यापुढील चरित्र महिमा श्रोते हो, सावधान चित्तानें ऐका. कुस्तीनंतर पांचव्या वर्षी अहमदनगर येथें राहणारा जव्हारअल्ली नांवाचा फकीर आपल्या शिष्यासह राहण्यास आला. वीरभद्राचे देवळाजवळील एका उघड्या बखळींत त्या दैववान फकीरानें तळ दिला. खरोखरच तो फकीर नशीबवान नसता तर ज्याच्या चमत्कारांचा डंका सर्वत्र गाजत आहे असा श्रीसाई बाबांसारखा शिष्य त्याला लाभला नसता. गावांत अनेक लोक होते. त्यांत कैक मराठेही होते आणि त्यांतलाच एक भगू सदाफळ त्या फकीराचा सेवेकरी झाला. हा फकीर मोठा पढीक होता. कुराण शरीफ म्हणजे त्याच्या हातचा नुसता मळ. म्हणूनच बरेचसे स्वार्थी, परमार्थी आणि भाविक लोक त्याच्या भजनीं लागले. त्याने एक " इदगा " बांधावयास सुरवात केली. कांहीं काळ लोटल्यानंतर वीरभद्र बाटविला म्हणून त्याच्यावर आरोप आला. इदग्याचें काम बंद पडलें आणि लोकांनीं त्या फकीराला गांवाबाहेर हांकून लावल्यानंतर तो शिरडीस बाबांकडे येऊन मशिदींत राहूं लागला. तो मोठा मृदु भाषणी असल्यामुळें सारा गांव त्याच्या भजनीं लागला आणि कांहीं करणी करून बाबांसही त्यानें मोहिनी घातली आहे, असें लोक म्हणूं लागले. 'माझा चेला हो' असें त्यानें बाबांस सांगितलें. बाबाही स्वभावानें रंगेल. त्यांनीं हूं म्हणतांच त्याला फार आनंद झाला आणि तो बाबांस घेऊन निघाला. बाबासारखा उत्तम शिष्य आणि जव्हार अल्ली त्यांचे गुरु. मग काय विचारतां? त्या दोघांनीं राहत्यास जाऊन राहावयाचें असें ठरविलें. गुरुला शिष्याची कला माहीत नव्हती; परंतु शिष्य गुरुच्या सर्व अवकळा जाणत होता. इतकें असूनही शिष्यानें गुरूचा अनादर न करितां आपला शिष्य धर्म पाळला. गुरुमुखांतून निघालेला शब्द बरोबर किंवा चूक आहे याचा विचार न करितां बाबांनीं तो वरचेवर झेलावा. गुरुगृहीं त्यांनीं पाणी देखील वाहून आणलें. अशी गुरुसेवा चालली होती. मधूनच केव्हां केव्हां बाबा शिरडीस येऊन जात. असें जेव्हां वरचेवर होऊं लागलें तेव्हां बाबा फकीराच्या नादानें राहत्यास राहून शिरडीला अंतरले असें लोकांना वाटूं लागलें. जन म्हणूं लागले जव्हार अलीनें योगबळानें साईंना आपल्या जवळ आकळून ठेवलें आहे. परंतु साईंची कला वेगळीच होती. ते देहाभिमान जाळीत होते. श्रोते अनुमान करतील कीं, साईंना अभिमान कुठून आला. लोकसंग्रहार्थ आणि अवतार कार्यपूर्तीसाठीं बाबा असे वागत होते.

बाबांच्या शिरडींच्या प्रेमळ भक्तांना बाबांपासून दूर राहणें योग्य वाटत नव्हतें. बाबा पण आपल्या भक्तांच्या आधीन होते. ग्रामस्थ उद्विग्न झालेले पाहून आतां पुढें काय करावें या विचारांत ते पडले. जसें सोनें आणि त्याचें तेज किंवा दिवा आणि ज्योति त्याचप्रमाणें या उभयतां गुरुशिष्यांचें ऐक्य होतें. त्यांना एकमेकांपासून विभक्त करणें कठीणच काम होतें. तरी पण बाबांना परत आणण्याचा प्रयत्न करण्यासाठीं शिरडीची शिष्यमंडळी राहात्यास त्या इदग्याजवळ गेली. बाबा त्यांना पाहून उलटच बोलूं लागले, 'अहो, तो फकीर महाक्रोधी आहे. त्याच्या नादीं लागूं नका. तो मला कधीं विसंबणार नाहीं. आतांच तो गांवांतून परत येईल आणि तुमचें निसंतान करील. त्याचा राग मोठा कठीण आहे म्हणून तुम्ही आतां पळून जा. त्याला राग आला म्हणजे तो लाल लाल होतो म्हणून ताबडतोब तुम्ही येथून निघून जा आणि तडक शिरडीची वाट पकडा. बाबा उलटें बोलत आहेत तेव्हां आतां काय करावें असा ती मंडळी विचार करीत आहेत तोंच फकीर अकस्मात तेथें आला. त्यानें दरडावून विचारलें. 'कायरे, त्या पोरांसाठीं येथें आलांत काय! कसल्या गोष्टी करीत होतां त्याच्या बरोबर ? त्याला शिरडीस परत नेण्याच्या फंदांत मुळींच पडूं नका.' असें जरी तो प्रथम म्हणाला, तरीपण गावकऱ्यांना पाहून तो मनांत कचरलाच आणि पुढें कसा म्हणतो, 'त्याला नेतां तर मलाही बरोबर घेऊन चला.'

असो, तो फकीर बरोबर आला. त्या फकीराला बाबांना सोडवत नव्हतें आणि बाबाही त्याला विसंबत नव्हते. या दोघांचा काय ऋणानुबंध होता तो नकळे साई प्रत्यक्ष परब्रह्माचा पुतळा. उलटपक्षीं जव्हारअल्ली म्हणजे भ्रमाचा भोपळा होता. देवीदासानें त्याची परिक्षा केली आणि हा भोपळा शिरडींत फुटला.

देवीदास शिरडीस आले त्यावेळी अकरा वर्षांचे होते. दिसावयास ते फार सुंदर होते आणि त्याचे डोळे सतेज होते. वयानें लहान आणि कमरेला लंगोटी लावलेली अशा वेषांत ते मारुतीच्या देवळाजवळ उतरले होते. आप्पा भिल्ल, म्हाळसापती त्यांच्याकडे जात. काशिराम वगैरे मंडळी त्याना शिधा पुरवीत. त्यांची महती वाढत होती. बाबा लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर आले. त्याच्या अगोदर बारा वर्षांपूर्वी देवीदास शिरडीस येऊन राहिले होते. आप्पा भिल्लाला ते पाटीवर शिकवून व्यंकटेश स्तोत्र त्याच्याकडून पढवून घेत असत. सर्वांकडून तें मुखोद्गत म्हणवून घ्यावयाचें नियमित पाठ चालला होता. देवीदास महाज्ञानी होते तात्या गणपत पाटील उर्फ तात्याबा यांनीं त्यांना गुरु केलें आणि काशिराम वगैरे शिष्टमंडळी त्यांच्या चरणीं लागली होते. या देवीदासापुढें ग्रामस्थांनीं फकीराला आणून शास्त्रीय वाद मांडिला. फकीर वादांत हरला आणि त्याला गांवांतून हांकून लावण्यांत आलें. फकीर तेथून निसटला तो वैजापूर येथें जाऊन राहूं लागला. पुढें कित्येक वर्षांनीं शिरडीस आला आणि त्यानें बाबांस नमस्कार केला. आपण गुरु आणि साई शिष्य हा त्याचा भ्रम पार निरसून जाऊन पश्चात्तापानें तो शुद्ध झाला होता.

बाबांनींहि त्याचा पूर्वीप्रमाणेंच सत्कार केला. अशी बाबांची लीला अगाध आहे. निवाडा व्हावयाचा तो योग्यवेळीं झालाच पण तो गुरु आणि आपण त्याचा शिष्य हा भाव तेथपर्यंत त्यांनीं आचरिला. त्याचें गुरुपण त्याला आणि आपलें शिष्यपण आपणाजवळ हा ह्या कथेंतला उपदेश होता. तो स्वतः साईबाबांनीं पूर्णपणें आपल्या आचरणांत आणला होता. आपण कोणाचें होऊन राहावें अथवा कोणास आपलें करावें. याहून निराळें असणें चांगलें नाहीं कीं तेणेंकरून दुसऱ्याची थोरवी यत्किंचित कमी होणार नाहीं, हाच बाबांच्या ह्या वागणुकीपासून मिळणारा धडा असून जो धैर्यानें तो धडा गिरवील तोच पूर्णपणें निरभिमानी होईल. येथें स्वतःच्या बुद्धिची चतुराई कांहींच कामास येत नाहीं. ज्याला स्वतःचें हीत साधावयाचें असेल त्यानें अभिमान सोडला पाहिजे. ज्यानें देहाचा अभिमान टाकून दिला आहे त्यानेंच खरोखर आपला देह सार्थकी लावला आहे; मग परमार्थ साधनासाठीं तो कोणाचाही चेला होईल यांत आश्चर्य तें कसलें ? अशा या वयानें लहान असलेल्या गोजिऱ्या मूर्तीची निर्विषय स्थिति पाहून लहान थोर सर्व लोक आश्चर्यानें विस्मित झाले आणि सारेजण बाबांचें कौतुक करूं लागले. ज्ञान्यांचे देह व्यापार त्यांच्या पूर्वकर्मानुसार होत असले तरी कर्मभाराचा त्याना मुळींच स्पर्श न होता ते कर्मातीत असतात. सूर्यप्रकाश होतांच अंधार नाहींसा होतो. त्याचप्रमाणें ज्ञानियांची द्वैत भावना नाहींशी झालेली असून त्यांची अद्वैत स्थिति झाल्यामुळें ते सर्व विश्व स्वस्वरुपीं जाणत असतात. श्रीसाईबाबांचे परमभक्त म्हाळसापतींनीं गुरुशिष्यांच्या आचरणाची ही कथा जशी सांगितली तशीच संपूर्ण ती येथें कथन केली आहे.

असो; श्रोतेहो पुढील चरित्र याहूनहि गहन आहे. त्याचें कथाक्रम कथन करण्यांत येईल तें ऐकण्यास सावध असा. मशीद पूर्वी कशी होती, मोठ्या कष्टानें तेथें फरशी कशी करण्यांत आली, श्रीसाई हिंदू आहेत कीं यवन आहेत, हें खात्रीनें कोणी सांगूं शकत नव्हता. धोती बस्ती वगैरे योग्य प्रकार साई कसे करीत आणि भक्तांचे भोग भोगीत असत. या सर्व गोष्टींचें निवेदन पुढें यथासांग करण्यांत येईल. हेमाड साईस शरण असून त्यांच्याच चरण प्रसादानें हें कथानिरुपण करूं शकत आहे. ही पुण्यदायक कथा ऐकल्यानें सर्वांचीं पापें नाहींशीं होतील.

अशा रीतीनें श्रीसंतजनांनीं प्रेरित केलेला आणि हेमाडपंतांनीं रचलेल्या श्रीसाई-समर्थसच्चरित्राचा " पुनः प्रकटी भवनं " नामें पांचवा अध्याय संपूर्ण झाला.

**॥ श्रीसद्‌गुरुसाई-नाथार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥**

---

सद्‌गुण कोणते व त्यांची मातब्बरी काय आहे हें माणसाला समजतें; परंतु तें त्याला आचरणांत आणतां येत नाहींत. दुर्गुण कोणते हें माणूस समजूं शकतो परंतु त्यांचा त्याग करण्याचें सामर्थ्य त्याच्या ठायीं नसतें. याला कारण ? माया. मायेच्या सामर्थ्यापुढें त्याला हात टेकावे लागतात.

**—स्वामी शिवानंद**

# श्रीगुरुपौर्णिमा उत्सव, शिरडी, शके १८८२

श्रीसाईबाबा संस्थानचा गुरुपौर्णिमेचा यंदाचा उत्सव शिरडी येथें दि. ७–८–९ जुलै १९६० गुरुवार ते शनिवार या तीन दिवसांत उत्साहानें साजरा करण्यांत आला. नेहमीप्रमाणें भक्तांच्या येण्याजाण्याकरितां रेल्गाड्यांची व जादा एस. टी. बसेसची व्यवस्था केली होती. तसेंच त्यांना उतरण्यासाठींही मंडप वगैरे उभारले होते. उत्सवा-आधीं महाएकादशीस व द्वादशीस रात्रौ मंदिरांत किर्तनें झालीं. गुरुवारीं पहांटे उत्सवास सुरवात सनईच्या मंजुळ स्वरांत कांकड आरतीनें झाली. द्वारकामाईत साईनाम संकीर्तन व श्रीसाई सच्चरित्र पारायणही उत्साहांत ६ वाजल्यापासून सुरू झालें. तत्पूर्वी महाराजांचे तैलचित्र पोथी व वीणा यांची मिरवणूक भजनासहीत गुरुस्थान वगैरे वरून नेण्यांत आली. भजनांत चित्रई येथील कोळी समाजाच्या ३५ स्त्रीपुरुषानीं उत्साहानें भाग घेतला. सायंकाळी ४ ते ७ श्री. देव ट्रस्टी यांचें सुश्राव्य किर्तन गुरुपौर्णिमेचें महत्व व गुरुपूजनाचें वैशिष्ट्य यांवर झालें आख्यान बाबांच्या लीलांवरून आधारलेलें होतें. रात्रौ पालखीची मिरवणूक नेहमीच्या थाटांत श्री. साईच्या निरनिराळ्या भजनानें निघाली.

यंदा भक्तांच्या संख्येचा विचार करून गुरुवार शुक्रवारींही वैयक्तिक अभिषेक करण्यांत आले. तसेंच अर्पण केलेल्या कपड्यांचे लिलावांतही भक्तांचा उत्साह दिसून आला. शुक्रवारीं भक्तांची बरीच गर्दी होती. पण पोलिस, होमगार्ड व स्वयंसेवकांनीं व्यवस्था चांगली ठेवली. शुक्रवारीं रात्रौ ९ ते पहांटेपर्यंत मंदिर खुले होतें व आलेल्या सर्व कलावंतांनी हजेरी दिली.

बाबांचे भक्त श्री. एस. नीलकंठम आंध्र प्रदेश यांचे देणगीतून त्यांच्या इच्छेप्रमाणें मिरवणुकीचे फोटोचे पाठीस संपूर्ण चांदीचे पत्र्यानें मढविलें व श्री. खोब्रागडे यांनीं समाधीच्या दोन पायऱ्या व श्री. मालपेकर यानीं एक पायरी अशा तीनहि पायऱ्या चांदीनें मढविल्या. त्यामुळें समाधीस अधिकच शोभा आली. शुक्रवारीं रात्रौ रथांतून श्रीबाबांचे छबीची मिरवणूक मळे चंद्रज्योतींच्या प्रकाशांत व भजनांत व वाद्यांच्या गजरांत थाटानें गांवांतून मिरवली. ठिकठिकाणीं ओवाळले. आलेल्या भक्तांनीं उत्साहानें भाग घेतला. शनिवारीं सकाळीं संस्थान गवई श्री. मराठे यांचे काल्याचें कीर्तन होऊन दहीहंडी होऊन उत्सव उत्साहात समाप्त झाला.

---




## जून, १९६०

**या** महिन्यांत प्रारंभास भक्तांची बरीच गर्दी व जून १२ तारखेनंतर गर्दी कमी होती, याचें कारण पावसाळा सुरू झाला आहे हें होय. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें:—

**कीर्तन**—श्री. श्री. वा. ऊर्फ बाबुराव देव, वकील, ठाणें. ( सं. दू. ) श्री. ह. भ. प. जेऊरकर बाबा, मु. जेऊर. श्री. ह. प. सिताबाई नंदुरबार (प. खानदेश). श्री. मराठे गवई, सं. गवई.

**बासरी व क्लॅरायलिन् वाद्य वादन**—श्री. जयसिंग भोई, कोळीवाडी, मुंबई. श्री. अरुण पौडवाल, मुंबई.

**गायन वादन**—श्री. मार्तंडबुवा पंढरीनाथ पवार ( गवईऔंध ) श्री. माधवराव सुकाळे श्री. ल. म. जाधव लोणावळा. श्री. आर. एन. पराडकर मुंबई, सौ. मंगलाबाई पराडकर मुंबई, श्री. नारायण परब मुंबई, श्री. बी. एस. मणी मद्रास, श्री. विठ्ठल शामराव ठाकरे मु. घारणा (यवतमहाल), श्री. कमलाबाई रायचूर, श्री. पी. के. माणीकबाई रायचूर, श्री. प्रतिगंधर्व मास्तर गिरधर औंदुवर, ( इंदौर साईनाथ भजनी मंडळ ) इंदौर, श्री. पांडुरंग भागते बुलढाणा, श्री. श्रीधर पाटकर, सौ. ताराबाई मुंबई, श्री. गणपत नायडू, श्री. रत्नाकर मुंबई.

**नकला** — श्री. एन्. एन्. गोलीवडेकर, लोणावळा.

**हार्मोनियमवादन** — श्री. बळवंत केशव कुळकर्णी सांगली, श्री. बाबुराव तुकाराम कांबळे, बुलढाणा.

**तबलावादन**—श्री जगन्नाथ मार्तंड पवार औंध. श्री. गोविंद खंडागळे, बुलढाणा


**नृत्य** — श्री. बाबुलाल डॅन्सर इंदौर ( माळवा )

**थोरामोठ्यांच्या भेटी**

मे नामदार जत्ती महाशय मुख्य मंत्री म्हैसूर; मे. नामदार कन्नमवार मंत्री महाराष्ट्र राज्य मे. नामदार देसाई शिक्षण मंत्री महाराष्ट्रराज्य, मे. नामदार भारदे सहकार मंत्री अ. नगर, मे. नामदार गांढे, महाराष्ट्रराज्य; मे. नामदार पटेल. वरील प्रमाणें बड्या मंडळींनीं श्री साईबाबांचें दर्शन घेतलें व कांहींनीं पूजन केलें.

**हवापाणी** — पावसाळा सुरू असून हवा चांगली आहे.

---

तारेचा पत्ता : 'ABHAY' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

# हैद्राबाद सॅनेटोरियम

**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयींनीयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं
चालविलेलें एकमेव ठिकाण.

पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

## गरीब साईभक्तांसाठीं खास सवलत

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा :—

**सुपरिंटेंडेंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**
**रमतापूर, हैद्राबाद १३. [ आंध्र प्रदेश ]**






★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते !

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,

ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि

आणि त्याचप्रमाणें वैशिष्टयपूर्ण

सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५२४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनी तयार केलेले श्री साईबाबांचें तीन रंगी चित्र, द्वारकामाई व इतर एक रंगी फोटो—साइज १० × ८, १० × १४, १४ × २० व पोस्टकार्ड साइज खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

श्री. सगुण मेरु नाईक

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर

मुद्रक : शा. कृ. साफळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४
संपादक व प्रकाशक : ना. आ. सावंत, ईस्ट ॲन्ड वेस्ट